# LIB 013

## ग्रंथालय आणि माहितीशास्त्र : घटना, घडामोडी, भाष्य

ज्ञानगंगा घरोघरी


*संपादक*

डॉ. मधुकर शेवाळे

*कार्यकारी संपादक*

प्रा. प्रवीण घोडेस्वार

*संपादक मंडळ*

डॉ. राजेंद्र कुंभार, पुणे
डॉ. मोहन खेरडे, अमरावती
डॉ. धर्मराज वीर, औरंगाबाद
डॉ. नमिता खोल, कोल्हापूर
डॉ. मंगला हिरवाडे, नागपूर
प्रा. प्रकाश बर्वे, नाशिक



©२०१६

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ



*निर्मिती*

श्री. आनंद यादव, व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, य. च. म. मुक्त विद्यापीठ

*मुद्रक*

*प्रकाशक*

डॉ. प्रकाश अतकरे, कुलसचिव, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक-४२२२२२



**पत्रव्यवहाराचा पत्ता**

**वर्गणी व व्यवस्थापन** – डॉ. मधुकर शेवाळे, उप-ग्रंथपाल व प्रमुख, ग्रंथालय आणि माहितीस्रोत केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२२२२.

**संपादकीय (साहित्य पाठविण्यासाठी)** – डॉ. मधुकर शेवाळे, उप-ग्रंथपाल व प्रमुख, ग्रंथालय आणि माहितीस्रोत केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२२२२.



❖ या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.


# ज्ञानगंगोत्री


वर्ष १७वे ज्ञानगंगोत्री : जून २०१६ ते ऑगस्ट २०१६ अंक-१

ISSN 2231-6507


## *अनुक्रमणिका*


| | | |
|---|---|---|
| ● संपादकीय | | ०१ |
| ● सोल २.० द्वारे प्रति- तालिकीकरण | विशाल दत्तात्रय बापते | ०३ |
| ● सर्वेक्षणाकरिता ऑनलाईन प्रश्नावली : एक उपयुक्त साधन | अश्विनी प्रभू | १५ |
| ● प्रेडटरी प्रकाशक : भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेसमोरील एक गंभीर समस्या | एस. बी. पाटील | २६ |
| ● डी. जी. रूपारेल महाविद्यालय 'पुस्तकपेढी' योजना : एक पाहणी | सचिन गराटे | ३६ |
| ● वाचन प्रेरणा दिवस : एक उपक्रम | डॉ. राजेंद्र चिकटे | ५० |
| ● अजून ताजा वास जुन्याला | गं. दे. खानोलकर | ५८ |



| | | |
|---|---|---|
| सुट्या अंकाची किंमत | : संस्था रु. १०० | व्यक्ती : रु. ३० |
| वार्षिक वर्गणी | : संस्था रु. ४०० | व्यक्ती : रु. १२० |

मागील अंक उपलब्धेनुसार पाठविले जातील. वर्गणीचा धनाकर्ष (डीडी) 'वित्त अधिकारी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक' या नावे काढलेला आणि नाशिक येथे देय असावा.

B16-17-67

# संपादकीय

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे ग्रंथालय आणि माहितीशास्त्रविषयक वर्तमान घटना, घडामोडी, भाष्य या संदर्भात प्रसिद्ध होणाऱ्या 'ज्ञानगंगोत्री' त्रैमासिकाचे हे १७वे वर्ष. मागील १७ वर्षांमध्ये ग्रंथालय आणि माहितीशास्त्रावरील विविध संशोधनात्मक, माहितीपर, नवीन तंत्रज्ञानविषयक तसेच तात्त्विक स्वरूपातील मांडणीसंदर्भात बदलत्या वाचन साहित्यास अनुषंगून ग्रंथालयीन कार्ये आणि सेवा त्याचबरोबर ग्रंथालयशास्त्रविषयक शिक्षण या बाबींची चर्चा घडवून आणण्याचा आटोकाट प्रयत्न करण्यात आलेला आहे. वाचन साहित्याचे बदलते स्वरूप व वाचन चळवळ यावरही वेळोवेळी भाष्य करण्यात आलेले आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने वाचन चळवळीला अधिक महत्त्व प्राप्त झाले असून त्यासंदर्भात सर्वत्र वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्यात येतो. ग्रंथालय चळवळीमध्ये अशा प्रकारच्या उपक्रमांचे निश्चितच महत्त्व आहे. वाचन चळवळ वृद्धिंगत करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित होत असते. या त्रैमासिकाच्या माध्यमातून ग्रंथालय व माहितीशास्त्रविषयक तात्त्विक आणि प्रात्यक्षिक ज्ञानसाधनेबरोबर वाचन चळवळ वृद्धिंगत होण्यास मदत होते, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. केवळ ग्रंथपाल आणि ग्रंथालयशास्त्र शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठीच हे त्रैमासिक नसून अन्य वाचकांनाही याचा उपयोग होत असतो.

प्रस्तुत अंकामध्ये सोल या ग्रंथालय प्रणालीतील तालिकीकरण संदर्भातील 'कॉपी कॅटलॉगिंग'चे महत्त्व विशद करण्यात आलेले आहे. त्यामुळे द्विरुक्ती टळू शकते. प्रति तालिकीकरणसंदर्भातील फायदे, समस्या यावर श्री. विशाल बापते यांनी साधक-बाधक चर्चा केली आहे. संशोधनाकरिता माहिती मिळविण्याठीची जी साधने आहेत त्यापैकी प्रश्नावली हे एक साधन आहे. एखाद्या संशोधन समस्येकरिता ऑनलाईन प्रश्नावली हे साधन कसे उपयुक्त ठरू शकते याची चर्चा श्रीमती अश्विनी प्रभू यांनी केलेली आहे. प्रेडटरी प्रकाशक ही अलीकडील संकल्पना विशेषत: विद्यापीठ अनुदान आयोगाने शिक्षकांच्या मूल्यमापनाकरिता आवश्यक केलेल्या संशोधन घटक लेखनाच्या अनुषंगाने मोठ्या प्रमाणावर लेखन, प्रकाशन कार्यास वेग आलेला दिसतो. आवश्यक गुणवत्ता नसतानाही लेखन होत असल्याचे दिसून येते. प्रेडटरी प्रकाशकसंदर्भातील विविध मुद्यांना श्री. एस. बी. पाटील यांनी अतिशय अभ्यासपूर्ण लेखाचे सादरीकरण केले आहे. महाविद्यालयांमध्ये पुस्तकपेढी योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना



ग्रंथालय सेवा देण्यात येते. यासंदर्भात डी. जी. रूपारेल महाविद्यालयाच्या पुस्तकपेढी सुविधे संदर्भात वर्णनात्मक पद्धतीचा अवलंब करून वापरकर्त्यांच्या अपेक्षा, समाधान जाणून घेणे व भेडसावणाऱ्या अडचणींवर मात करून उपाययोजना सुचविण्याकरिता उत्कृष्ट लेख प्रपंच श्री. सचिन गराटे यांनी केलेला आहे.

वाचन प्रेरणा दिवसअंतर्गत अनेक प्रकारचे उपक्रम राबविण्यात येतात. या उपक्रमांपैकी 'ग्रंथप्रदर्शन' हा एक उपक्रम. सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठात ग्रंथप्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनासाठी वाचकांचा मिळालेल्या प्रतिसादाचे संशोधनात्मक विश्लेषण डॉ. राजेंद्र चिकटे यांनी केलेले आहे.

याशिवाय 'अजून ताजा वास जुन्याला' हे सदर पुन्हा सुरू करीत आहोत.

**डॉ. मधुकर शेवाळे**
संपादक

# सोल २.० द्वारे प्रति-तालिकीकरण

**विशाल दत्तात्रय बापते**
सहाय्यक ग्रंथपाल,
संत गाडगेबाबा, अमरावती विद्यापीठ, अमरावती
ई-मेल : vishal_bapte@rediffmail.com

*प्रति तालिकीकरण अर्थात कॉपी कॅटलॉगिंग ही ग्रंथालय प्रणाली वापरतानाची अत्यंत महत्त्वपूर्ण बाब आहे. तालिकीकरणाच्या नोंदीची पुनरावृत्ती होऊ नये यासंदर्भात कॉपी कॅटलॉगिंगचे खूप महत्त्व आहे. त्यामुळे वेळ आणि पैसा यांची बचत होतेच, शिवाय गुणवत्तापूर्ण सेवा देता येतात. सोल २.० द्वारे प्रति-तालिकीकरण कसे होते हे या लेखाद्वारे मांडणी करण्यात आले आहे.*

## प्रस्तावना

ग्रंथालयीन साहित्याची उपभोक्त्याला जाण करून देण्यासाठी तालिकीकरणाचा ग्रंथालये फार पूर्वीपासून उपयोग करीत आहेत. एखाद्या विशिष्ट ग्रंथालय आणि माहितीस्रोत केंद्रात नक्की कुठले अभ्यास साहित्य आहे, ह्याचे निश्चितीकरण करण्यासाठी असलेले हे एक माध्यम आहे. अर्थात हे निश्चितीकरण तो त्याच्या परिप्रेक्ष्यातून प्रलेखाच्या विविध अंगांचा वापर करून करीत असतो. ग्रंथालये तालिकीकरणावर बराच वेळ, पैसा, मनुष्यबळ खर्च करीत आहोत. तालिकापत्रे संगणकीकरणाच्या माध्यमातून तयार केली जात आहेत. हाच काय तो फरक. जेव्हा ग्रंथालयात नवीन प्रलेख येतो आणि ज्या ज्या अंगाने उपभोक्ता त्या प्रलेखापर्यंत पोहोचू इच्छितो, अशा सर्व बाजूंचा विचार करून त्या प्रलेखाची नोंद ग्रंथालयीन आज्ञावलीत तालिकीकरण या मेन्यूच्या आधारे केली जाते, परंतु एक गोष्ट सुस्पष्ट आहे की, एकच ग्रंथ जगातील अनेक ग्रंथालयांत उपलब्ध असतो. म्हणजे एकाच ग्रंथासाठी अनेक ग्रंथालये असंख्य नोंदी घेत असतो. मग मनात प्रश्न येतो की, ही पुनरावृत्ती का? अगदी खोलात जाऊन विचार केल्यास आपल्या बुद्धीला हे आव्हानच आहे. त्यावर सर्वांत चांगला उपाय म्हणजे प्रति-तालिकीकरण ज्याकडे आपण नेहमीच दुर्लक्ष करीत आलेलो आहोत. प्रति-तालिकीकरण म्हणजे अशी सोय पुरविणाऱ्या यंत्रणेमार्फत ग्रंथाच्या विविध तपशिलांची कॉपी करणे होय. यामुळे ग्रंथालये प्रलेखाच्या तपशील कुठल्याही टंकलेखनाशिवाय वेळ, पैसा आणि



प्रयत्नाशिवाय अंतर्भूत करू शकते. ग्रंथालयीन संगणकीकरणाच्या दृष्टीने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे.

## साहित्य समीक्षा

प्रति-तालिकीकरण आणि त्यासंबंधित अंगाने काही अध्ययने आढळून आलेली आहेत, परंतु प्रस्तुत लेखात सोल २.०च्या अनुषंगाने अध्ययन करण्यात आले असून हेच या लेखाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. तरीसुद्धा या अध्ययनाच्या अनुषंगाने खालील साहित्य समीक्षा उचित ठरेल.

टॅलमॅक्स १२ म्हणतो प्रति-तालिकीकरणात व्यावसायिक सूज्ञता असणे अत्यंत आवश्यक आहे. त्याने युनिव्हर्सिटी ऑफ न्यू साऊथ वेल्स लायब्ररी, ऑस्ट्रेलिया या विद्यापीठात ऑस्ट्रेलियन बिब्लीओग्राफिक नेटवर्कद्वारे प्रति-तालिकीकरणाची प्रक्रिया कशी पार पाडली जाते याचे वर्णन केले आहे. त्याने हे काम व्यावसायिक (कुशल) किंवा अर्धकुशल मनुष्यबळाद्वारे करून घ्यावे काय, याचादेखील ऊहापोह घेतलेला आहे. याबाबतीत समारोप करताना तो म्हणतो की, गुंतागुंतीचा प्रलेख हा अनुभवी कर्मचाऱ्यांकरिता राखीव ठेवला पाहिजे.

कोटस् आणि किजेल यांनी स्वयंचलित प्रलेख निवड, ग्रंथोपार्जन आणि ग्रंथपुरवठाधारकाचा डाटाबेस आणि युनिर्व्हसिटी ऑफ वॉशिंग्टन विद्यापीठातील ओसीएलसी प्रौम्टकर सेवा या माध्यमातून जलद तालिकीकरण, ग्रंथनिवड, ग्रंथोपार्जन विभागातील कर्मचारी वर्ग, प्रति तालिकीकरणासाठीचा कर्मचारी वर्ग यांच्यासाठी फायदे शोधून काढलेले आहेत.

होनेस्टेनने ॲडल्फी विद्यापीठ ग्रंथालयाचा प्रति-तालिकीकरण कररूपाने देण्याचा आणि ब्लॅकवेलच्या १९९५ पासूनचा ग्रंथोपस्कार सेवेच्या अनुभवाचे वर्णन केलेले आहे.

बेस, पॉल आणि विल्सन यांनी रिसर्च लायब्ररी अँड इन्फॉरमेशन नेटवर्क (RLIN) मधून प्रति-तालिकीकरणाद्वारे मिळविलेल्या नमुन्यांचे परीक्षण केलेले आहे. लायब्ररी ऑफ काँग्रेसद्वारे मिळविलेल्या नोंदीत केलेले बदल आणि आधुनिक आणि उत्तम ग्रंथपालाद्वारे केलेले बदल यात फारसा फरक आढळून आला नाही. निष्कर्षांती सहकारी तालिकीकरण प्रकल्पांचे उदाहरणार्थ राष्ट्रीय सहकारी तालिकीकरण कार्यक्रमाद्वारे केलेल्या बदलाचे आणि विस्ताराचे समर्थन करण्यात आले आहे.

बिओल आणि काफादर यांनी ओसीएलसी वर्ल्डकॅट डाटाबेसमधून मिळविलेल्या नोंदीतील शंभर टंकलिखित चुका शोधून काढलेल्या आहेत. याच शंभर नोंदी स्थानिक

पातळीवरील पाच ग्रंथालयांतून मिळवून त्यांनी टंकलिखित असणाऱ्या शंभर चुका दूर केल्या किंवा नाही हे शोधून काढण्यात आले. ३५.८ % चुका दुरुस्त केल्याचे संशोधनाअंती आढळून आले. समारोप करताना लेखक म्हणतात टंकलेखनाद्वारे होणाऱ्या चुका उच्च दर्जाच्या संगणकीय ग्रंथसूचीचे महत्त्व अधोरेखित करतात. प्रति-तालिकीकरण करण्याच्या प्रक्रियेत टंकलेखनाद्वारे निर्माण होणाऱ्या चुकांच्या दुरुस्ती करताना किती महत्त्व द्यावे याचेही याद्वारे मार्गदर्शन मिळते.

## सोल २.० आणि तालिकीकरण मेन्यू

सोल ही इन्फलिबनेटद्वारे तयार केलेली अद्ययावत आज्ञावली आहे. महाविद्यालये व विद्यापीठांची गरज लक्षात घेऊन ही आज्ञावली तयार करण्यात आली आहे. सोलची नवी आवृत्ती सोल २.० जानेवारी २००९मध्ये सुरू करण्यात आली. सोल डाटाबेसची नवी आवृत्ती किंवा कुठल्याही परस्परपूरक डाटाबेस व्यवस्थापन प्रणाली (RDBMS) साठी तयार करण्यात आलेली आहे. सोल २.० मार्क २१ सूची प्रकार, बहुभाषिक सूचींच्या नोंदीकरता युनिकोडवर आधारित सार्वत्रिक अक्षर मंच आणि इलेक्ट्रॉनिक्स सुरक्षा आणि नियमन यासाठी असणारे २.० आणि यांसारख्या आंतरराष्ट्रीय मानकांशी सुसंगत आहे.

तालिकीकरण या मेन्यूचा ग्रंथालयीन संसाधनांचे पूर्वलक्षी रूपांतर (Retrospective Conversion) करण्यासाठीदेखील उपयोग होतो. तालिकीकरण या मेन्यूचे प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१. तालिकाकरणास विविध ग्रंथालयीन संसाधनांच्या नोंदी घेण्याकरिता विविध नमुने तयार करण्याची सोय आहे.
२. मार्क २१च्या लीडर आणि फिक्सड फिल्डचे विविध नमुने आहेत.
३. व्यक्तींची नावे, संस्था, विषय शीर्ष आणि मालिका नाम यांची अधिकारपत्रे तालिकापत्रात तयार करणे.
४. मार्क २१च्या नमुन्यात प्रमाणकाच्या माध्यमातून प्रति तालिकीकरणास साहाय्यभूत
५. प्रकाशकांचा मास्टर डाटाबेस तयार करणे.
६. मार्क२१ सूची प्रकारास पूर्णत: साहाय्यभूत.

## मूळ तालिकीकरण

एम. एम. शुल्ट्झच्या मतानुसार मूळ तालिकीकरण म्हणजे संबंधित प्रलेखाच्या



इतरत्र उपलब्ध असलेल्या किंवा त्याच प्रलेखाच्या नवीन आवृत्तीचा कुठलाही आधार न घेता स्वतंत्रपणे ग्रंथसूची तयार करणे होय. अशाप्रकारे तालिकीकरण करताना प्रलेखाच्या काही भागांचे परीक्षण करून आवश्यक माहिती मिळविली जाते. विशिष्ट प्रकारच्या प्रलेखांकरिता उदा. स्थानिक इतिहासाचे वर्णन करणारे साहित्य, आर्काइव्हल साहित्य, दुर्मीळ ग्रंथ, हस्तलिखिते, नकाशे आणि ध्वनिमुद्रिका, इत्यादी तसेच दैनंदिन कुठल्याही प्रलेखाचे मूळ तालिकीकरण करता येते. मूळ तालिकीकरणाचे यश हे प्रामुख्याने योग्य प्रशिक्षण आणि उमेदवारीवर अवलंबून असते. त्याचप्रमाणे ते वर्णनात्मक तालिकीकरण, विषय तालिकीकरण आणि तालिकीकरणाच्या वेगवेगळ्या साधनांचे ज्ञान यावरही अवलंबून असते. जर एखादे शीर्षक नव्याने प्रकाशित झाले असेल किंवा त्यात नावीण्यपूर्ण विषय हाताळला गेला असेल उदा. स्थानिक पातळीवरील किंवा सरकारी प्रलेख तर त्याबाबत ग्रंथाची सूची कुठेही उपलब्ध असणे शक्य नसते. अशा शीर्षकासाठी स्थानिक पातळीवर स्वतंत्रपणे सूची तयार करण्यात येते आणि हेच मूळ तालिकीकरण होय.

तालिकीकार प्रकाशित शीर्षकाचे परीक्षण करून MARC किंवा AACRII स्वरूपात त्या शीर्षकाची नोंद करतो. काही तालिकाकार लायब्ररी ऑफ काँग्रेस सबजेक्ट हेडींग्स (LCSH), सिअर्स लिस्ट ऑफ सबजेक्ट हेडींग्स किंवा मेडिकल सबजेक्ट हेडींग्ज (MSH) या माध्यमातून काही लोकप्रिय विषय शीर्षांची निवड करतात. एका स्वतंत्र नोंदीत वर्णनासाठी आवश्यक अशा अनेक विषयांचा किंवा घटकांचा समावेश असू शकतो. ऑनलाईन तालिकापत्रात हे विषय शीर्षक शोधबिंदू म्हणून उपयुक्त ठरतात. ऑनलाईन तालिकीकरणाचा प्रवाह आकृती क्र. १ मध्ये दर्शविला आहे.

## प्रति-तालिकीकरण (Copy Cataloguing)

ग्रंथालयाच्या जगात तालिकीकरणाच्या क्षेत्रात बरेच बदल घडून आलेले आहेत. प्रति तालिकीकरण हा याच प्रवासातील एक मैलाचा दगड आहे. मूळ तालिकीकरणाचा हा एक पर्याय आहे. प्रति-तालिकीकरणात उपलब्ध तालिकीपत्रातून एखाद्या प्रलेखाची किंवा प्रलेखांची सारखी, हुबेहूब नोंद मिळवली जाते, ग्रंथालयीन आज्ञावलीमार्फत ती स्वीकारली जाते, बदल आवश्यक असतील तर ते केले जातात,

स्थानिक पातळीवर आवश्यक तो तपशील अंतर्भूत केल्या जातो. ओसीएलसीचे वर्ल्डकॅट, ऑनलाईन कॅटलॉग ऑफ लायब्ररी ऑफ काँग्रेस, इन्फ्लिबनेटचे इंड्कॅट यासाठी महत्त्वपूर्ण स्रोत ठरतात.




**आकृती १. ऑनलाईन तालिकीकरण प्रवाह**

इन्फ्लिबनेटने सहकारी तत्त्वावर तालिकापत्रे तयार करण्यासाठी उत्तेजन देण्यास व एकाच नोंदीची पुन्हा नक्कल करण्याच्या वृत्तीस आळा घालण्यास ऑनलाईन प्रति तालिका प्रणाली (Online Copy Cataloguing System (OCS) विकसित केली आहे. ओसीएसच्या साहाय्याने आपल्याला हव्या असणाऱ्या आणि इंड्कॅटमध्ये



उपलब्ध असणाऱ्या नोंदी सोल २.० या आज्ञावलीमार्फत थेट तालिकापत्रात ओढता येतात. एखादी नवी नोंद इंड्कॅटमध्ये चढवतादेखील येते. या प्रणालीमार्फत अगोदरच असलेल्या नोंदीत नवी नोंद अंतर्भूत करता येते. तसेच अगोदर अस्तित्वात असलेल्या नोंदी वगळता येतात. ओसीएलसीचे 'कनेक्शन' नावाच्या साधनामार्फत वर्ल्डकॅटमध्ये उपलब्ध नोंदीचा वापर करून प्रति-तालिकीकरण यशस्वी करता येते. कनेक्शनच्या माध्यमातून साधर्म्य असणाऱ्या नोंदी शोधता येतात आणि आपल्या नोंदी कनेक्शनमध्ये उपलब्ध करता येतात. विशेषत: स्थानिक पातळीवर नोंदी तयार करून कनेक्शनमध्ये त्याचे परीक्षण करता येते.

## सोल २.० द्वारे तालिकीकरण

सोल २.०च्या तालिकीकरण मेन्यूत (Cataloguiong Module) प्रति-तालिकीकरणाची सोय आहे. त्यासाठी 'Import and Export' (आवक व जावक) हा उपघटक उपलब्ध आहे. या घटकावर क्लिक केल्यास 'Import from MARC' (मार्कमधून आयात) हा पर्याय उपलब्ध होईल. यानंतर पडद्यावरील 'Import Bibliographic Record' (ग्रंथसूची नोंद आवक करा) हा पर्याय निवडा. ज्या प्रलेखाची/ग्रंथांची प्रति तालिकीकरणाच्या माध्यमातून नोंद करायची आहे, त्या प्रलेखाची ग्रंथसूची मार्क नमुन्यात लायब्ररी ऑफ काँग्रेस किंवा इन्फ्लिबनेटच्या किंवा अशा प्रकारची सेवा देणाऱ्या तत्सम संकेतस्थळावरून आवक करायची आहे. येथपर्यंतची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर या 'Browse' पर्यायाद्वारे मार्क नमुन्यातील संग्रहीत नोंदी निवडून 'Import' (आवक) वर क्लिक करायचे आहे. काही क्षणातच 'Data Imported' म्हणजे नोंदीची आवक झाल्याचा संदेश प्राप्त होईल. 'Data Imported' वर क्लिक केल्यास एकूण किती नोंदीवर प्रक्रिया झाली, एकूण किती नोंदीची भर पडली आणि नोंदीचे ओळख क्रमांक दिसून येतात. स्क्रीन बंद करून 'Add Accession no. to Imported Data' (आवक नोंदीना दाखल अंक द्या) हा पर्याय निवडून स्थानिक पातळीवरील माहिती जसे दाखल अंक, वर्गांक, अर्थ नियोजन, किंमत, ग्रंथपुरवठाधारक, इ. संबंधित माहिती समाविष्ट करता येईल.

या पर्यायासोबतच स्थानिक पातळीवरील माहितीसाठी अंतर्भूत करण्यासाठी

या 'Predefined Data Entry' पर्यायाची निवड करता येईल. 'Edit' (सुधार करा) हा पर्याय निवडून आवक केलेल्या शीर्षाची नोंद संख्या निवडता येईल. प्रत्येक नोंदीनुसार स्थानिक माहिती भरून संग्रहीत करायची आहे. जर एखादी नोंद पूर्णपणे नष्ट करायची आहे, तर त्यासंबंधीचा तपशील मार्क स्वरूपात संग्रही करून ठेवता येतो. त्यामुळे भविष्यात तालिकीकरण करताना ह्या संग्रहीताचा उपयोग करता येतो.



**आकृती २. सोल २.0 मधील मूळ तालिकीकरणासाठी असलेली पूर्वनियोजित नोंद समावेशन पत्रिका**

## प्रति-तालिकीकरणाच्या पायऱ्या

प्रति-तालिकीकरणाचा अवलंब करताना खालील पायऱ्यांचा (आकृती ३(अ) व ३(ब) अवलंब करावा.

१. कोणत्या प्रलेख नोंदीची आवक करायची हे निश्चित करा.

२. या नोंदी लायब्ररी ऑफ काँग्रेसचे संकेतस्थळ, इन्फ्लिबनेटची इंडकॅट किंवा तत्सम सेवा देणाऱ्या संकेतस्थळावर शोधा.

३. अचूक नोंदी प्राप्त झाल्यानंतर त्या ग्रंथालयीन आज्ञावलीत अंतर्भूत करा.

४. आवक केलेल्या नोंदीचा तपशील आणि वैधता तपासल्यानंतर स्थानिक



पातळीवरील माहितीची भर घाला.



**आकृती क्र. ३(अ) सोल २.0 मार्फत प्रति-तालिकीकरण**



**आकृती क्र. ३(ब) सोल २.0 मार्फत प्रति-तालिकीकरण**

## प्रति-तालिकीकरणाचे फायदे

प्रति-तालिकीकरणाचे प्रमुख फायदे खालीलप्रमाणे आहेत.

१. ग्रंथसूची स्वतंत्रपणे टंकलिखित करण्याची आवश्यकता नाही.

२. संपूर्ण नोंदी ही कॉपी केलेली असल्यामुळे टंकलिखित चुका टाळता येतात.

३. विश्वसनीय स्रोतापासून कॉपी केलेले असल्यामुळे प्राप्त नोंदी परिपूर्ण व शास्त्रीय दृष्ट्या अचूक असतात.

४. तालिकीकरणासाठी एक आगळा वेगळा पर्याय प्राप्त होतो.

५. माहितीस्रोतांच्या भागीदारीस उत्तेजन मिळते.

## प्रति-तालिकीकरणाच्या समस्या

या संदर्भातील काही अडथळे खालीलप्रमाणे आहेत.

- प्रांतिक भाषांतील नोंदीकरिता प्रतिप्राप्ती होणे कठीण आहे.
- प्रति-तालिकीकरण करणाऱ्यास तांत्रिक कौशल्य असणे आवश्यक आहे. अन्यथा नोंदीमध्ये जास्त चुका होण्याची शक्यता आहे.
- प्रांतिक भाषेतील नोंदीचे बोधांक सहजासहजी प्राप्त होत नाहीत.
- मार्क कोडिंगबाबत चुका होऊ शकतात.

## भारतातील प्रति-तालिकीकरण

ग्रंथालयीन स्वयंचलिकरण म्हणजे केवळ ग्रंथालयीन संगणकीकरण नाही, ज्यामध्ये केवळ ग्रंथालयीन क्रिया-प्रक्रियांचा समावेश होतो, तर त्यामध्ये क्रिया-प्रक्रियांशिवाय, तंत्रे व इतर सर्व बाबींचा समावेश होतो. ज्यात सर्व कार्य स्वंय-चलित, परंतु जलद आणि पूर्वीपेक्षा अधिक कार्यक्षमतेने होतात. भारतातील केवळ ३५% विद्यापीठांचे व महाविद्यालयांचे संगणकीकरण झालेले आहे. स्वयंचलिकरण नव्हे. (बऱ्याचदा संगणकीकरण हा शब्द स्वयंचलिकरण या अर्थाने वापरला जातो.) त्यातही या सर्व संस्था शहरातील आहेत. खऱ्या परिस्थितीचे आकलन होण्यासाठी चर्चा आणि संशोधनाची जोड आवश्यक आहे. भारतात ग्रंथोपार्जन व नियतकालिक, त्यासंबंधी मोड्युल न वापरणारे असंख्य ग्रंथालये आहेत. म्हणजेच प्रति-तालिकीकरणाचा उपयोग होत नाही, हे स्पष्ट होईल. कदाचित काही ग्रंथपालांना हे तंत्र माहीत असेल; पण अवगत नसेल, परंतु अन्य विकसित देशांत प्रति-तालिकीकरण, ओसीएलसीच्या माध्यमातून अनेक वर्षांपासून उपयोगात आणले जात आहे. आज मालकी हक्क असणाऱ्या सर्व आज्ञावल्यांमध्ये नोंदी आवक करण्याची सोय आहे. इन्फ्लिबनेटसारखी संस्था पूर्वलक्ष्यी रूपांतर (Retrospective Conversion) प्रति-तालिकीकरणाच्या



माध्यमातून करण्याकरिता वेळोवेळी कार्यशाळा व प्रशिक्षण शिबिरे आयोजित करीत आहेत. एक पाऊल पुढे जाऊन असे म्हणता येईल की ज्यावेळेस प्रकाशक आपल्या ग्रंथांसोबत अगोदरच मार्क नमुन्यात तालिकापत्रे उपलब्ध करून देतील तेव्हा ग्रंथालयांना त्यांच्या ग्रंथालयीन आज्ञावलीमध्ये या नोंदीची आवक करणे सोयीचे होईल.

काही ग्रंथालयांमध्ये तालिकीकरणाची प्रक्रिया ग्रंथोपार्जनसोबत सुरू होते. अशा परिस्थितीत प्रति-तालिकीकरण केवळ नोंदीची दुरुस्ती किंवा सुधारणा करण्यापर्यंत शक्य होऊ शकते. सोल २.० मध्ये नवी नोंद निर्माण झाल्यावर त्यास स्वतंत्र क्रमांक मिळतो. तालिकीकरण ग्रंथोपार्जन मेन्यूपासून सुरू केल्यावरही एक स्वतंत्र क्रमांक प्राप्त होतो. अशा या नोंदीत बदल करायचे झाल्यास तालिकीकरण मेनुच्या माध्यमातून स्वतंत्र नोंद तयार होत असल्यामुळे हे शक्य होणार नाही.

## समारोप

भारतातील शैक्षणिक ग्रंथालयांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी प्रति-तालिकीकरण अत्यंत आवश्यक आहे. स्वयंचलित ग्रंथालयाकडे नेणारे हे एक पाऊल आहे. या अनुषंगाने ग्रंथालयीन व्यावसायिकांवर काही जबाबदाऱ्या येतात. जसे इंड्कॅट, वल्ड्कॅट किंवा इतर तत्सम सेवा देणाऱ्या संकेतस्थळावरून ग्रंथसूचीबाबत नोंदी शोधणे, त्यांची अचूकता पडताळणे, मिळविलेल्या नोंदीची हव्या असणाऱ्या नोंदीसंदर्भातून पडताळणी करणे, मार्क संकेतलिपीचे ज्ञान, निर्देशन, आएसबीडी संदर्भातील सुधारणा करणे याबाबत ज्ञान प्राप्त करणे. तालिकीकरण करणाऱ्या व्यक्तीने कालबाह्य मार्ग टाकून नवे प्रवाह आत्मसात करणे उत्कृष्ट कार्यसिद्धीसाठी आवश्यक आहे. प्रति-तालिकीकरण पारंपरिक काम आधुनिक पद्धतीने करण्याची संधी उपलब्ध करून देतो. असे असले तरी त्याबाबतचे गुण-दोष अशा सर्व अंगांनी विचार करणे आवश्यक आहे. जेणेकरून मालकी हक्क असणाऱ्या किंवा मुक्त स्रोत आज्ञावली यामध्ये हा वापर शक्य आणि व्यवहार्य होईल.

भारतातील प्रकाशक अजूनही ग्रंथासोबत मार्क नोंदी पुरवत नाहीत; परंतु विकसित देशांतील काही ग्रंथपुरवठाधारक प्रकाशित केलेल्या ग्रंथांसोबत मार्क नोंदी पुरवतात. कारण व्यावसायिक दृष्टिकोनाबरोबरच याबाबतचे महत्त्व त्यांनी ओळखले आहे. भारतातील ग्रंथ व्यावसायिकांनी याबाबत अजूनही आघाडी घेतलेली नाही. अशा प्रकारचा आग्रह जर त्यांनी धरला तर प्रति-तालिकीकरणाचे नवे दालन प्राप्त होईल.

## संदर्भ

1. (n.d.) Retrieved November 15, 2015, from INFLIBNET : http://www.inflibnet.ac.in/soul/modules.php#cat

2. (n.d.) Retrieved November 15, 2015, from INFLIBNET : http://www.inflibnet.ac.in/soul

3. (n.d.) Retrieved November 15, 2015, from INFLIBNET : http://indcat.inflibnet.ac.in/includes/UserGuide_OCS.pdf.

4. Beali, J., & Kafadar, K. (2004). The effectiveness of copy cataloguing at eliminating typographical errors in shared bibliographic records. Retrieved Frebruary 5, 2015, from

   http://search.proquest.com/docview/216887988?accountid=l60817

5. Chandrakar, R., & Arora, J. (2010). Copy cataloguing in India: A point-of-view. Retrieved December 31, 2014, from http://search.proquest.com/docview/357265718?accountid=35054

6. Coats, J., & Kiegel, J. (2003). Automating the nexus of book selection, acquisitions and rapid copy cataloguing. Retrieved June 24, 2015, from http://www.tandfonline.com/doi/abs/10/1080/14649055.2003.10765894

7. Horenstein, B. (2000). Outsourcing copy cataloguing at adelphi university libraries. Retrieved June 25, 2015, from http://tandfoonline.com/doi/pdf/! 0./300/J 104v28n-04_09

8. OCLC Connexion, (n.d.). Retrieved January 15, 2015, from http://oclc.org/connexion/features.en.html#acc

9. Orbih, D. E., & Aina, A. J. (2014). Issues, benefits and challenges of original cataloguing versus copy cataloguing: The experience at logos state university. Retrieved January 8, 2015, from http://www.academicjournals.og/IJLIS

10. Original cataloguing, (n.d.). Retrieved January 5, 2015, from LIS Wiki: http:www.academicjournals.org/IJLIS

11. Sung, M. G. (2013). Ten essential qualities for success: A new cataloguing librarian's from a supervisor's perspective. Retrieved December 30, 2014, from http://search.proquest.com/docview/1371822969?accountid=35054

12. Talmacs, K. (2014). Copy-catalguing: A professional task? Retrieved June 24, 2015, fromhttp://search.proquest.com/docview/5782002?accountid=35054

13. Weiss, J., Paul, J., & Wilson, M. (1991). An analysis of copy cataloguing: Library of congress vs. selected RUN members. Retrieved June 25, 2015, from http://search.proquest.com/docview/57055907?accountid=35054

14. Wilson, K. (2006). Computers in libraries: An introduction/ or library technicains. New Delhi: New Age International.

# सर्वेक्षणाकरिता ऑनलाईन प्रश्नावली : एक उपयुक्त साधन

**अश्विनी प्रभू**
ग्रंथपाल, श्रीमती मणीबेन एम. पी. शाह महिला महाविद्यालय,
माटुंगा, मुंबई - ४०० ०१९
ashwini2004@rediffmail.com

*सर्वेक्षण ही संशोधन समाजविज्ञान शाखेत मोठ्या प्रमाणावर वापरली जाणारी पद्धती आहे. याअंतर्गत लोक अथवा गटांचे वर्तन, विचार व त्यांच्या भावना यांसारख्या विषयांवर संशोधक माहिती गोळा करतात. सर्वेक्षण पद्धतीत वापर समाजशास्त्र, विपणन संशोधन, राजकारण, मानसशास्त्र, इत्यादी विविध क्षेत्रांत केला जातो. प्रश्नावली ही सर्वेक्षणात माहिती गोळा करण्याच्या हेतूने वापरले जाणारे एक संशोधन साधन आहे. प्रश्नावली म्हणजे प्रश्नांची मालिका अथवा संच, ज्याद्वारे काहीतरी तथ्य किंवा एखाद्या विषयावरील लोकांची मते संशोधन गोळा करतात. आज तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे टपालाद्वारे वितरित केल्या जाणाऱ्या पारंपरिक प्रश्नावलीला पर्याय म्हणून ऑनलाईन सर्वेक्षण साधने आपल्यास उपलब्ध झालेली आहेत. निम्न लेखात ऑनलाईन सर्वेक्षण साधने, त्यांची मूलभूत कार्यपद्धती तसेच त्यांचे फायदे व तोटे यांचा ऊहापोह केला आहे.*

## प्रस्तावना

सर्वेक्षण ही संशोधन समाजविज्ञान शाखेत मोठ्या प्रमाणावर वापरली जाणारी पद्धती आहे. याअंतर्गत लोक अथवा गटांचे वर्तन, विचार व त्यांच्या भावना यासारख्या विषयांवर संशोधक माहिती गोळा करतात. सर्वेक्षण संशोधनाचा मूळ हेतू लोकसंख्येचे वर्णन, एक अथवा भिन्न गटांची वैशिष्ट्ये ओळखणे, त्यांचे वर्णन व अभ्यास हा आहे. सामाजिक सर्वेक्षण एक वैज्ञानिक पद्धती असून तिचा उद्देश निश्चित भौगोलिक क्षेत्रातील व्यक्तींच्या सामाजिक जीवन समस्या तसेच सामाजिक क्रियांच्या संबंधित तत्थ्यांचे



संकलन करणे होय. सर्वेक्षण माहिती (Data), सविस्तर परिणामवाचक (Quantitative) किंवा गुणात्मक (Qualitative) स्वरूपात असू शकते. एका विषयासंदर्भात हवी असलेली माहिती व्यक्तीकडून मिळवण्यासाठी तयार केलेली प्रश्नांची एक क्रमबद्ध सूची म्हणजे प्रश्नावली होय. बहुतेक वेळा प्रश्नावलीत दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून उत्तर नोंदवायचे असते.

## विविध विषयांत माहिती

डेटा गोळा करण्यासाठी अनेक प्रकारच्या पद्धती प्रचलित आहेत. टपालाने प्रश्नावली साठविणे ही एक पारंपरिक माहिती गोळा करण्याची पद्धत आहे. आज तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे नवीन नवीन साधने आपल्यास उपलब्ध झालेली आहेत. ही साधने फारच प्रचलित असून ऑनलाईन सर्वेक्षण साधने म्हणून प्रसिद्ध आहेत. गूगल डॉक्स (Googledocs) सर्व्हेमंकी (Surveymonkey), सर्व्हेगिझ्मो (SurveyGizmo) ही काही उदाहरणे होय. साधने आणि वापरकर्त्यांचा संवाद साधत संपादन आणि योगदान हे वेब २.० प्रणालीचे वैशिष्ट्ये आहे. माहिती व तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे ऑनलाईन सर्वेक्षण साधनांचा वापर करून माहिती महाजाल म्हणजेच वेब किंवा इंटरनेट सर्वेक्षण हा अत्यंत सोपा व सोयीस्कर पर्याय गेल्या काही वर्षांपासून उपलब्ध झाला आहे. ही साधने संशोधकांना प्रश्नावली निर्माण करून सोयीस्कर, जलद रितीने सहभागी प्रतिसाद दात्यांपैकी वितरित करण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. तसेच माहिती तत्क्षणी संकलित करून संशोधकास त्वरित प्राप्त करून देतात. याच कारणास्तव वैज्ञानिक व सर्वेक्षण संशोधन अशा औपचारिक तसेच ग्राहक किंवा कर्मचारी समाधान प्रश्नावली अशा अनौपचारिक क्षेत्रामध्ये वापरल्या जातात.

## मूलभूत कार्यपद्धती

सर्वसाधारणपणे ही साधने ऑनलाईन पद्धतीने प्रश्नावली विकसित करून, ती योग्य व्यक्तींपर्यंत पोहोचवून त्यांच्याकडून माहिती गोळा करण्यासाठी सुलभ मार्ग पुरवतात. अशी सर्वेक्षणे ज्यात लहान उत्तरे अपेक्षित आहेत त्याकरिता ऑनलाईन सर्वेक्षण साधने अधिक उपयुक्त ठरतात. या साधनांतर्गत अंशिक अथवा पूर्ण सेवेचा पर्याय उपलब्ध असतो आणि त्यांची किंमत सेवा पातळीनुसार बदलते. बहुतेक साधनांच्या वापराकरिता किमान तांत्रिक क्षमता आवश्यक आहे. याचा वापर करण्याकरिता आपले खाते (User Account) त्या साधन प्रदात्यासोबत उघडणे ही प्रथम पायरी होय. त्यानंतर प्रमुख कार्ये

(Functions) वापरण्यासाठी उपलब्ध होतात. याकरिता अनेकदा ऑनलाईन मदतदेखील दिली जाते, ज्याचा वापर संशोधक करू शकतो.

### साधने विकसित करणे

या साधनांत व्यापक कार्यक्षमता असलेली अनेक वैशिष्ट्ये अंतर्भूत असतात. ज्याचा उपयोग करून ऑनलाईन मूल्यांकनासाठी प्रश्नावली सहज विकसित करता येते. बहुतांश घटनांमध्ये प्रश्नावली थेट संकेतस्थळावरच विकसित केली जाते, परंतु 'Inquisite' सारख्या साधनांमुळे प्रश्नावली offline म्हणजेच संगणकावर विकसित करून मग ऑनलाईन साईटवर देता येते. प्रश्नावली विकसित करण्याच्या प्रक्रियेत बहुतांश वेळा खालील प्रकारची मदत दिली जाते.

### प्रश्नावलीतील नेमके प्रश्न व प्रश्नावलीनिर्मितीकरिता मदतीचे पर्याय उपलब्ध करून देणे

सर्वेक्षण करणाऱ्यांनी स्वत: त्यांच्या उद्दिष्टांनुसार प्रश्न लिहिणे आवश्यक व अपेक्षित असले तरी बऱ्याच वेळा ऑनलाईन साधने त्यांच्या मेनू (Menu) द्वारे उपयुक्त पर्याय सुचवतात, ज्याचा वापर प्रश्नावली निर्मितीसाठी होऊ शकतो.

### सूचनांसाठी व इतर मजकुरासाठी मोकळी जागा उपलब्ध करून देणे

प्रश्नावलीचे प्रश्न निर्माण करण्याव्यतिरिक्त ही साधने वापरकर्त्याला सूचना किंवा अन्य संदेश मजकूर प्रश्नावलीत समाविष्ट करण्यास परवानगी देते, ज्यामुळे प्रश्न व अपेक्षित उत्तरांबद्दल अधिक माहिती देणे सुलभ होते.

### प्रश्नावली स्वरूपण (Formatting)

याअंतर्गत प्रश्नाची योग्य रचना वा क्रमवारी (वापरकर्त्याद्वारे परिभाषित), ओळींमधील अंतर, समास व पृष्ठ व्यवस्था करता येते.

### प्रश्नावलीची तर्कशास्त्रीय अंमलबजावणी करणे

काही साधने निवडक मागील प्रश्नांच्या प्रतिसादावर आधारित पुढील प्रश्न अथवा पृष्ठ प्रश्नावली सोडवणाऱ्या समोर प्रस्तुत करण्याची सोय देतात. याला ''तर्कशास्त्रीय कार्यक्षमता'' (Logic Functionality) असे संबोधतात.



### पूर्वावलोकन आणि माहिती तंत्रज्ञान चाचणी प्रक्रिया करण्याची क्षमता

साधने विकासप्रक्रियेदरम्यान आणि ती प्रतिसादकर्त्यांकडे पोहोचण्यापूर्वीच वापरकर्ते त्या साधनाचे पूर्वावलोकन आणि त्याची कार्यक्षमता चाचणी घेऊ शकतात. ही चाचणी प्रक्रिया सर्वेक्षण साधन विकासात एक महत्त्वाची पायरी आहे. तर्कशास्त्र योग्य पद्धतीने काम करत आहे किंवा नाही? डाऊनलोड केलेली माहिती अपेक्षांच्या पातळीवर पूर्ण उतरतो की नाही? या आणि अशा सर्व प्रश्नांची होकारात्मक उत्तरे मिळावयास हवी. एकदा प्रश्नावलीची परीक्षा घेऊन 'चाचणी' माहिती तपासल्यावर वापरकर्त्याला पुढे जाण्यापूर्वी ही चाचणी माहिती खोडून/पुसून टाकणे जरुरीचे आहे.

### साधनांची अंमलबजावणी

प्रश्नावलीचा विकास आणि त्याची चाचणी केल्यावर ती योग्य त्या प्रतिसादकर्त्याकडून माहिती गोळा करणे सहज साध्य करतात. साधनाची कार्यक्षमता जोखताना तसेच त्याचे मूल्यांकन करताना त्यात खालील वैशिष्ट्ये समाविष्ट आहेत का ते तपासावे.

- वापरकर्त्यांना माहिती संकलित करण्यासाठी प्रश्नावली 'उघडण्याची' परवानगी प्रदान करणे.
- एकदा साधन उघडले गेल्यानंतर साधनामधील पुढील संपादने संभाव्य माहिती न गमावता करणे शक्य होत नाही.
- साधनाचा URL मेलमध्ये समाविष्ट करून प्रतिसादकर्त्यांकडे पाठवता येणे अथवा वेबसाईटमधून तो दुवा (Hyperlink) उपलब्ध करून देणे.
- प्रतिसादांची देखरेख

बहुतांशी साधने किती प्रतिसादकर्त्यांपर्यंत प्रश्नावली पोहोचली आहे याची माहिती वापरकर्त्यांना पाहू देतात. गरज भासल्यास वापरकर्ते ठराविक प्रतिसादकर्त्यांचा अंतरिम संकलित माहिती (Dataset) डाउनलोड करू शकतात. या सर्व गुणविशेषांमुळे तसेच मिळालेल्या माहितीमुळे प्रतिसाद दर वाढवण्यासाठी वापरकर्त्यांना मदत होते व अशा प्रकारे एकूणच चांगला मूल्यांकन डेटा संकलित करता येतो.

### माहिती ॲक्सेस / डाउनलोड

एकदा माहिती गोळा केल्यावर, ऑनलाईन मूल्यांकन उपकरणे माहिती संचयित

करण्यासाठी एक सोयीस्कर जागा आणि विश्लेषण करण्याकरिता माहिती डाउनलोड करण्याची सुविधा या दोन्ही गोष्टी प्रदान करतात. माहिती डाउनलोड करण्यासाठी पर्याय हे प्रत्येक साधनाप्रमाणे बदलत जातात आणि त्याची चर्चा पुढील विभागात केली आहे.

कुठल्याही सर्वेक्षण अभ्यासाप्रमाणेच ऑनलाईन साधनांचा वापर करताना सुनिश्चित प्रकल्प गरजांचा गंभीर विचार होणे आवश्यक आहे. निर्णयप्रक्रियेत खालील प्रश्नांची योग्य उत्तरे मिळणे अपेक्षित आहे.

- आपले वापरकर्ते/अंमलबजावणी करणारे कोण आहेत? (उदा. सर्वेक्षण साधन हाताळणारे अथवा सर्वेक्षण साधन विकसित करणारे) त्यांची मूल्यांकन संबंधित कौशल्याची पातळी काय आहे?
- आपण काय साध्य करण्याचा प्रयत्न करत आहोत?.
- आपला अभ्यास कोणत्या प्रकारची मूल्यांकन उद्दिष्टांवर केंद्रित आहे.
- अंतिम माहिती काय स्वरूपात अपेक्षित आहे?.
- आपले प्रतिसाददाते कोण आहेत? त्यांना संगणक सहज उपलब्ध आहे का? तसेच संगणक वापराची आवश्यक कौशल्ये? त्यांच्या जवळ आहेत का?

आपला मूल्यांकन मसुदा वेळेआधी तयार करून मग विविध साधने हाताळा व त्यांचा सराव करा. यामुळे आपल्या गरजांवर आधारित वैशिष्ट्ये आणि इतर कार्यक्षमता प्रकार निश्चित करण्यास मदत होईल. पुनरावलोकन आणि विविध साधनांची चाचणी करताना खालील बाबींचा विचार करा.

- ते (साधन) वापरावयास सोपे आहे का? आपल्या संस्थेच्या संभाव्य प्रतिसाददात्यांवर ''चाचणी'' घ्या. बहुतांश साधने त्यांच्या संकेतस्थळावर विशिष्ट कालावधीकरिता मोफत डाउनलोड, प्रात्यक्षिक किंवा काही संयोजन ऑफर करतात. त्याचा जरूर लाभ घ्या.
- साधन प्रतिसाद साठवण्यासाठी सुरक्षित सर्व्हर पुरवतो का याची खात्री करा. माहितीची गोपनीयता सुरक्षित राहील तसेच तांत्रिक त्रुटीमुळे माहिती नष्ट होणार नाही याची हमी आवश्यक ठरते. याबाबत संकेतस्थळावर काय माहिती उपलब्ध आहे ते तपासा. जर ही माहिती दिलेली नसल्यास तांत्रिक किंवा विक्री सल्लागाराशी संपर्क साधा.
- आपल्याला आवश्यक असलेल्या प्रश्नांचे प्रकार दिलेले आहेत का ते तपासा? (उदा. तो मुक्त प्रश्न, सक्ती-उत्तर प्रश्न, एकाधिक निवड, इत्यादी).
- साधन इतर काही विशेष वैशिष्ट्ये प्रदान करते का? उदा. ग्राफिक्स, एचटीएमएल (HTML) कोडिंग समाविष्ट करण्याची क्षमता, पाने किंवा प्रश्न वगळण्यासाठी क्षमता, प्रश्नांचे क्रमांकन, इत्यादी.



सरते शेवटी ऑनलाईन सर्वेक्षण साधने हे एक अत्यंत व्यावसायिक, गतिमान आणि स्पर्धात्मक क्षेत्र आहे हे लक्षात ठेवा, त्यामुळे अंतिम निर्णय घेण्यापूर्वी मूलभूत सेवा बदल, स्वरूप, इत्यादी तपासणे महत्त्वाचे आहे.

**फायदे**

१. **वेळा आणि पैशाची बचत –** ऑनलाईन साधने वापरून संशोधक वेळ आणि पैसा वाचवू शकतो.

२. **कमी वेळ –** त्वरित उपयोजन आणि प्रतिसाद परत मिळवणे पारंपरिक पद्धतीने शक्य नाही. जे ऑनलाइन सर्वेक्षणात सहज शक्य आहे. जर सर्वेक्षणात संपर्क माहिती चूक असेल, तर आपल्याला ऑनलाईन प्रश्नावली पाठवल्यावर लगेच कळेल.

३. **कमी खर्च –** टपालाचा खर्च वाचल्यामुळे आपला संशोधन खर्च जवळपास निम्म्याने कमी होतो.

४. **कमी श्रम –** माहिती प्रविष्ट करण्यासाठी आपली ऊर्जा खर्च करण्याची गरज नाही. प्रतिसाद स्वयंचलितपणे डेटाबेसमध्ये साठून त्यावर प्रक्रिया केल्या जातात आणि परिणाम लगेच उपलब्ध होतात.

५. **माहिती तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्रातील तज्ज्ञ ज्ञानाची गरज नाही –** प्रश्नावलीची रचना आणि लक्ष्य गटात त्याचा प्रसार सर्वांना सुलभ होतो. प्रतिसाददात्यांनादेखील त्यांचे अभिप्राय आणि मत पाठवणे सहज शक्य होते तेही अगदी अल्प कालावधीत. प्रश्नावली भरण्यासाठीदेखील जास्त वेळ व विशेष कौशल्य लागत नाही.

६. माहिती संकलन सुलभ होते तसेच माहितीचे एकत्रीकरण अतिशय सोपे आणि तार्किक होते.

७. **स्वयंचलन (Automation) आणि रिअल-टाइम (Real Time Access) –** प्रतिसाददाते स्वत: त्यांची माहिती भरत असल्यामुळे माहिती

आपोआप इलेक्ट्रॉनिक पद्धतीने साठवली जाते व हे शक्य होते.

८. **सुलभ विश्लेषण –** वर नमूद केलेल्या बाबींमुळे विश्लेषण सोपे व सुरळीत होते आणि लगेच उपलब्ध होते. गोळा झालेली माहिती आपोआप MS Excel मध्ये संग्रहित होते व चार्ट, आकृती आणि सारणी तयार करणे खूप सोपे जाते. ऑनलाईन सर्वेक्षणाचे निष्कर्ष कोणत्याही वेळी विश्लेषण करण्यासाठी उपलब्ध असतात. माहिती, आलेख किंवा तक्त्यामध्ये सहज सादर केला जाऊ शकतो. माहिती त्वरित उपलब्ध असते आणि अधिक तपशीलवार विश्लेषण आवश्यक असल्यास अगदी सहजपणे विशेष संख्याशास्त्रीय सॉफ्टवेअर किंवा स्प्रेडशीटमध्ये हस्तांतरित केली जाऊ शकते.

९. **प्रतिसाददात्यांची सोय –** ते त्यांच्या सोयीने, त्यांच्या वेळापत्रकानुसार प्रश्नांची उत्तरे देऊ शकतात तसेच अगदी एका वेळी पूर्ण प्रश्नावली न सोडविता मध्येच थांबून नंतर उर्वरित पूर्ण करू शकतात. बाजार विश्लेषकांना असे आढळून आले आहे की, ऑनलाईन सर्वेक्षणातील सहभागी बहुतेक वेळा दीर्घ आणि अधिक तपशीलवार उत्तरे देतात. इंटरनेटवरील अनामित वातावरणात सुरक्षित वाटून ते खुली आणि अधिक खात्रीलायक प्रतिसाद देण्याची शक्यता जास्त असते.

१०. **प्रतिसाददात्यांसाठी सुलभ –** इंटरनेटचा वापर करत असलेले बहुतांश लोक दूरध्वनी किंवा पेन आणि कागद वापरण्याऐवजी ऑनलाइन सर्वेक्षण पद्धतीमार्फत उत्तरे देण्यास प्राधान्य देतात असे आढळून आले आहे. ऑनलाईन सर्वेक्षणातील सहभागी त्यांच्या सोयीनुसार वेळ निवडू शकतात. ज्यामुळे प्रश्नावली थोड्या वेळात पूर्ण करता येते. तसेच संबंधित नसलेले प्रश्न आपोआप वगळले जाऊ शकतात.

११. **रचनेचे स्वातंत्र्य व लवचीकता –** सर्वेक्षणाचे प्रोग्रामिंग केले जाऊ शकते. एखाद्या एकच निवड प्रश्नास फक्त एक प्रतिसाद नोंदविणे अनिवार्य करणे शक्य आहे. ऑनलाईन सर्वेक्षणातील प्रश्नांचा क्रम बदलला जाऊ शकतो किंवा एखादा प्रश्न मागील प्रश्नाच्या उत्तरावर अवलंबून पूर्णपणे वगळला जाऊ शकतो. याद्वारे एकच सर्वेक्षण प्रत्येक सहभागीसाठी अनुकूल (Customize) तयार केले जाऊ शकते व जसजसा तो किंवा ती प्रश्न सोडवील त्याप्रमाणे पुढील प्रश्न उपलब्ध होत जातील.

आपण रंग आणि आपल्या सर्वेक्षणाची मांडणी (Layout) निवडू शकता आणि



आपण आपल्या ग्रंथालयाचा लोगो (Logo) देखील जोडू शकता. मात्र यांचा वापर सावधतेने केला पाहिजे, कारण कधी कधी यामुळे इंटरनेटवर पाने प्रदर्शित (Load) होण्यासाठी विलंब होऊ शकतो व या प्रतीक्षेला कंटाळून संभाव्य प्रतिसादावर परिणाम होऊ शकतो.

१२. **मुलाखतकाराचा अभाव –** सर्वेक्षणात समोर कोणी मुलाखत घेणारी व्यक्ती नसल्याने वैयक्तिक माहिती देताना प्रतिसादकर्ते अधिक मोकळे असतात. बऱ्याचदा असे आढळून आले आहे की, मुलाखतकार प्रतिसादावर प्रभाव टाकू शकतो.

१३. **जलद –** एक ऑनलाईन सर्वेक्षण प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यक कालावधी पारंपरिक संशोधन पद्धतीपेक्षा सरासरी दोन–तृतीयांश आहे. माहिती आपोआप गोळा केली जात असल्याकारणाने आपल्याला पेपर प्रश्नावली परत येण्याची प्रतीक्षा करावी लागत नाही. प्रतिसाद दर जवळजवळ तत्काळ प्राप्त होतो. ऑनलाईन मार्केटिंग तज्ज्ञांच्या मते अर्धा अधिक प्रतिसाद संशोधन प्रकल्पाच्या पहिल्या तीन दिवसांच्या आत प्राप्त होतो.

१४. **अधिक अचूक –** सर्वेक्षणातील सहभागी त्यांचे प्रतिसाद थेट प्रणालीत प्रविष्ट करत असल्यामुळे त्रुटी किंवा चूक होण्याची शक्यता फारच कमी असते. पारंपरिक पद्धती प्रतिसाददात्याच्या योग्य तो सर्व तपशील लक्षपूर्वक प्रविष्ट करण्यावर अवलंबून असतात. तसेच पुन्हा–पुन्हा त्याच गोष्टी केल्यामुळे नैसर्गिकपणे मानवी चुका होऊ शकता ज्या ऑनलाईन सर्वेक्षण पद्धतीमध्ये टाळता येतात.

थोडक्यात, ऑनलाइन सर्वेक्षण हा कमी वेळेत, सोयीस्कर, स्वस्त आणि त्वरित परिणाम देणारा पर्याय आहे तसेच आपण माहिती (Data) इतरत्र वापरू व हस्तांतरित करू शकतो.

## तोटे

१. **तंत्रज्ञान विषमता (Digital Divide) –** विविध सामाजिक व आर्थिक गटांमध्ये संगणक व इंटरनेटच्या उपलब्धतेचा तसेच जलदगती इंटरनेट जोडणीचा अभाव असल्यामुळे डिजिटल डिवाइस या संकल्पनेचा जन्म झाला. त्यामुळे ऑनलाईन सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यापूर्वी स्थानिक लोक अथवा गटांमध्ये यासंबंधी सोयी सुविधांच्या उपलब्धतेचा विचार जरूर करावयास हवा.

२. **मर्यादित नमुना आणि प्रतिसाददात्यांची उपलब्धता –** वर नमूद केल्याप्रमाणे लोकसंख्येमध्ये इंटरनेटचा अभाव असल्यामुळे ऑनलाईन प्रश्नावलीस कमी प्रतिसाद मिळण्याची शक्यता असते. त्यामुळे ई-मेल, पत्ते किंवा संकेतस्थळावरील भेटींवर आधारित संभाव्य नमुने काढणे कठीण होते.

३. **संभाव्य सहकार्याबाबत समस्या –** अनेक क्षेत्रांत ऑनलाईन सर्वेक्षणास पारंपरिक पद्धतीसमान किंवा त्यापेक्षा किंचित जास्त प्रतिसाद दर मिळण्याची शक्यता असली तरी इंटरनेट वापरकर्त्यांवर आज सतत संदेशांचा मारा सुरू असतो. याचा कधी-कधी नकळतपणे ऑनलाईन सर्वेक्षणावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो व इच्छित प्रतिसाद प्राप्त होत नाही. काही लोकांना ई-मेल सर्वेक्षण अनैतिक आणि अनाहूत वाटू शकते. काही व्यक्तींना ई-मेल (किंवा बरोच ई-मेल) पाठविल्यास त्यांच्या ''गोपनीयतेवर आक्रमण'' केल्यासारखे वाटू शकते. तसेच स्पॅम (Spam) म्हणून नाकारले गेलेले वा वितरित न करण्यात आलेले ई-मेल किंवा संदेश कधी कधी संशोधकांसाठी चिंतेचा विषय ठरू शकतात.

४. **मुलाखतकाराचा अभाव –** वर उल्लेख केल्याप्रमाणे हा मुद्दा जसा फायद्याचा तसाच तोट्याचादेखील असू शकतो. प्रशिक्षित मुलाखतकाराची उणीव असल्यामुळे स्पष्टीकरण व अधिक चौकशी करणे शक्य नसते. ज्यामुळे मिळालेल्या माहितीची विश्वासार्हता कमी होऊ शकते.

५. **खर्च –** वितरण आणि छापील प्रश्नावलीचे संकल्प यावरील खर्च जरी वाचला तरी सर्व ऑनलाईन साधने मोफत नसतात. काही साधने मोफत मर्यादित आवृत्ती योजना (Limited Versions Free-of Charge) प्रदान करतात. ज्या अंतर्गत काही सेवा मर्यादित काळाकरिता मोफत असून पुढील वापरावर शुल्क आकारले जाऊ शकते. काही साधने त्यांची प्रगत ऑनलाईन वैशिष्ट्ये (Advanced Features) किंवा रचना वैशिष्ट्यांवर आधारित शुल्क आकारतात, तर काही साधने ठराविक पूर्वनिश्चित संख्येवर ई-मेल प्रश्नावली पाठविल्यास शुल्क आकारतात. व्यावसायिक स्पर्धेत राहण्यासाठी तसेच पैसे मिळवण्यासाठी ऑनलाईन साधनांमध्ये स्पर्धा आहे हे लक्षात घ्यावयास हवे.

यासंदर्भात काही खबरदारीच्या सूचना

- कोणत्याही एका साधन प्रदात्यावर (Tool Provider) अवलंबून राहणे टाळावे.



- वारंवार आपला डेटा डाउनलोड करावा आणि सुरक्षित तसेच अनेक ठिकाणी संचयित करावा. आपण आपल्या सेवा बंद केल्यास किंवा शुल्क न भरल्यास आपला डेटा अदृश्य केला जाऊ शकतो किंवा तो आपणास वापरास मज्जाव केला जाऊ शकतो.
- आपल्या ऑनलाईन प्रश्नावलीच्या ऑफलाईन प्रती तयार करा, ज्याचा उपयोग आपण गरज भासल्यास कागद आणि पेन्सील, ई-मेल किंवा दुसऱ्या ऑनलाईन सेवेद्वारे प्रश्नावलीचे पुनर्निर्माण करण्याकरिता करू शकता.
- वारंवार आणि सातत्याने सुधारणा करा व जतन करत राहा. आपला डेटा वर्ड प्रोसेसिंग दस्तऐवज स्वरूपात जतन केल्यास तो इतर कोणत्याही ऑनलाईन साधन प्रदात्यामार्फत प्रश्नावली पुनर्निर्माणाकरिता स्थानांतरित करणे सहज शक्य आहे.

## काळाची गरज

वरील फायदे आणि तोटे लक्षात घेता सर्वेक्षणासाठी डेटा संकलित करताना ऑनलाईन साधनांचा वापर करण्याआधी खालील घटक विचाराधीन घेणे आवश्यक आहे. संशोधन समस्या, लोकसंख्या आणि विचाराधीन नमुना हे यासंदर्भात महत्त्वाचे मुद्दे आहेत.

- खर्च
- वेळ
- जलद प्रसार (सहभागी आणि संशोधक दोघांच्या दृष्टीने)
- स्वरूप
- लवचीकता
- कार्यक्षमता
- उपयुक्तता
- मोठा नमुना आकार
- व्याप्ती आणि मर्यादा

## सारांश

ऑनलाईन मूल्यांकन उपकरणे अधिक सहज मूल्यांकन साधने तयार करून ती

संभाव्य प्रतिसाददात्यांमध्ये वाटप करून, माहिती गोळा करण्यासाठी तसेच परिणामी माहिती उपलब्ध करून देण्याचे एक प्रभावी माध्यम आहे. तथापि, प्रश्नावली तयार करताना जसा सहजपणे साधनांचा वापर केला जातो त्याचबरोबर प्रश्नावली निर्मिती करण्यापलीकडे जाऊन घटनांचा व मूल्यांकन साधनांचा वापर समजून घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. ही साधने प्रभावी आहेत तसेच ती खरच संशोधकांना मूल्यांकन उपक्रमांबाबत अधिक सक्षम बनवीत आहेत याबद्दल दुमत नाही, परंतु संपूर्ण संशोधन हे गोळा झालेल्या माहितीच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. म्हणूनच ही साधने वापरताना योग्य ती काळजी आणि खबरदारी घेणे आवश्यक आहे. चांगले मूल्यांकन करण्याकरिता काळजीपूर्वक केलेली उद्दिष्टांची व्याख्या आणि त्या अनुषंगाने विकसित केलेली विश्वसनीय आणि वैध मूल्यांकन उपकरणे अनिवार्य आहेत व ऑनलाईन साधने या महत्त्वपूर्ण टप्प्यांना पर्याय ठरू शकत नाहीत.

## संदर्भ सूची


Khode, S. (2015). Online Questionnaire for Survey Research: Comparative Study of the leatures Available with Free Account of Some Selected Tools. *PEARL - A Journal Of Vbrary And Information Science,* P(2)April-June, 101-105.

Marra, R. M., & Bogue, B. (2006). A critical assessment of online survey tools. *Women in Engineering ProActive Network.* Retrieved on May 1, 2016, from https://ioumals.psu.edu/wepan/article/viewFile/5 8473/5 8161

Singh, A., Taneja, A., & Mangalraj, G. (2009). Creating online surveys: some wisdom from the trenches tutorial. *IEEE Transactions On Professional Communication, 52(2)* June, 197-212.

Thiruvengada Mani, T. & Radhakrishnan, N. (2013). Online Questionnaires for E-Research and Surveys: Suitable Tool for Humanities. *PEARL - A Journal Of Library And Information Science,* 7(2) April - June, 70-74.




# प्रेडटरी प्रकाशक : भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेसमोरील एक गंभीर समस्या


**एस. बी. पाटील**

ग्रंथपाल, श्रीमती मथुराबाई कन्या महाविद्यालय, सांगली

librarian@rediffmail.com



*प्रस्तुत लेखामध्ये प्रेडटरी प्रकाशक म्हणजे काय? भारतीय उच्च शिक्षण व्यवस्था व प्रेडटरी प्रकाशक आणि जेफ्री बेलचे प्रेडटरी प्रकाशक निश्चित करण्याचे निकष या मुद्यांचे विवेचन करण्यात आले आहे. प्रेडटरी प्रकाशकांना आळा घालण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग, विद्यापीठ, वैयक्तिक शिक्षक व संशोधक आणि ग्रंथपाल यांच्या अनुषंगाने काही उपाययोजना सुचविल्या आहेत.*


## प्रस्तावना

'प्रेडटरी प्रकाशक' ही संकल्पना सन २०१०मध्ये कोलोरॅडो विद्यापीठातील ग्रंथपाल जेफ्री बेल यांनी या 'Charleston Advisor' नियतकालिकामध्ये मांडली. बेलच्या मते, प्रेडटरी प्रकाशक म्हणजे असे प्रकाशक जे 'स्कॉलरली ओपन ॲक्सेस' प्रतिकृतीचा गैरवापर करतात. तसेच लेखकाकडून दोषयुक्त व शास्त्रीय दर्जा नसलेले लेख स्वीकारतात किंवा आवश्यक संपादकीय आणि प्रकाशन सेवा न पुरविता त्यांच्याकडून पैसे उकळतात (Machovec, 2013). जेफ्री बेलने या http://scholaryoa.com/ वेबसाईटवर 'Potential, Possible or Probable Predatory Scholarly Open-access Publishers' या शीर्षकाखाली प्रेडटरी प्रकाशित आणि 'Potential, Possible or Probable Predatory Scholarly Openaccess Journals' या शीर्षकाखाली प्रेडटरी नियतकालिकांची यादी प्रकाशित केली आहे. या याद्या काळजीपूर्वक पाहिल्या असता त्यामध्ये भारतातील अनेक नियतकालिके व प्रकाशकांचा समावेश असल्याचे दिसते. प्रस्तुत लेखामध्ये भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेच्या संदर्भात प्रेडटरी प्रकाशकामुळे निर्माण झालेल्या गंभीर समस्येविषयी चर्चा करण्यात आली आहे.

## भारतीय उच्च शिक्षण व प्रेडटरी प्रकाशक

आज भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेचा महत्त्वाचा घटक म्हणून संशोधनाकडे पाहिले जाते. सन २०१०मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने 'संशोधन' या घटकाचा समावेश 'शिक्षक' या संवर्गाच्या शैक्षणिक कार्य मूल्यमापन प्रणालीमध्ये केला आहे. या प्रणालअंतर्गत समाविष्ट API (Academic Performance Indicators) फॉर्ममधील गुणदानाद्वारे शिक्षकांचे वार्षिक मूल्यमापन केले जाते. संबंधित ए.पी.आय. प्रणालीमध्ये नियतकालिकांमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधन लेखांना, चर्चासत्र/कार्यशाळा/ परिषदांमध्ये सादर व प्रकाशित झालेल्या लेखांना, ग्रंथलेखनाला व संशोधन प्रकल्पास ठराविक गुण देण्यात आले आहेत. या प्रणालीचा काळजीपूर्वक अभ्यास केला असता त्यामध्ये अनेक दोष आढळतात. उदाहरणार्थ ISSN, Impact Factor आणि Indexed नियतकालिकांतील लेखांसाठी व आय. एस. बी. एन. असणाऱ्या राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय पातळीच्या ग्रंथांना किंवा त्यामध्ये प्रकाशित झालेल्या प्रकरणांना अधिक गुण देण्यात आले आहेत. मात्र वास्तविक ISSN आणि ISBN हे क्रमांक विशिष्ट देशातील, विशिष्ट प्रकाशकांचे प्रकाशित नियतकालिके व ग्रंथ ओळखण्यासाठी वापरले जातात. या क्रमांकाचा अनुक्रमे नियतकालिकांच्या आणि ग्रंथांच्या दर्जाशी काहीही संबंध नाही, त्यामुळे या क्रमांकाच्या आधारे गुणदान करणे संयुक्तिक नाही. तसेच Impact Factor सुद्धा साध्या गणितीय आकडेवारीने मोजता येतो, त्याचबरोबर गुगल सर्च इंजीन आधारित 'Free Indexing Databases' च्या माध्यमातून नियतकालिके Automatically Indexed होतात. यासारख्या अनेक बाबी संशोधक आणि प्राध्यापकांना माहिती नसतात, त्याचाच फायदा घेऊन प्रेडटरी प्रकाशकांनी आपला ऑनलाईन व्यवसाय सुरू केला आहे. आकर्षक वेबसाईटस् ब्लॉग्स, फेसबुक पेज, ट्विटर अकाउन्ट्चा उपयोग करून ते आपल्या प्रकाशनांची जाहिरात करीत आहेत. शिवाय Spam E-mails पाठवून आपल्या नियतकालिकांमध्ये लेख लिहिण्यासाठी, संपादक मंडळावर/परीक्षण मंडळावर काम करण्यासाठी ते प्राध्यापकांना व संशोधकांना भुरळ पाडीत आहेत. काहींचा अपवाद वगळता अनेक प्राध्यापक व संशोधक या प्रेडटरी प्रकाशकांच्या मृगजळी जाहिरातबाजीला बळी पडत आहेत. याचाच परिणाम म्हणून सध्या वाङ्मयचौर्य ही (Plagiarism) समस्या गंभीर रूप धारण करीत असल्याचे चित्र दिसते.

## प्रेडटरी प्रकाशक निश्चित करण्याचे निकष

जेफ्री बेलने Committee on Publication Ethics (COPE) च्या 'Code



of Conduct for Journal Publishers' आणि 'Principales of Transparency and Best Practice in Scholarly Publishing' या दोन प्रलेखांवर आधारित प्रेडटरी ओपन ॲक्सेस प्रकाशक निश्चित करण्याचे खालील निकष सांगितले आहेत.

### १. संपादक आणि कर्मचारी (Editor and Staff)

- प्रकाशकाचा मालक हाच त्या प्रकाशकामार्फत प्रकाशित होणाऱ्या प्रत्येक नियतकालिकांचा संपादक असतो.
- कोणतीही एक व्यक्ती कोणत्याही एका विशिष्ट नियतकालिकाचा संपादक असत नाही.
- नियतकालिकांमध्ये औपचारिक संपादक/परीक्षण मंडळाचा उल्लेख असत नाही.
- संपादक, संपादकीय कर्मचारी वर्ग आणि परीक्षण मंडळाच्या सदस्यांची शैक्षणिक माहिती व ते काम करत असलेल्या संस्थेची माहिती उपलब्ध करून दिली जात नाही.
- संपादक/परीक्षण मंडळाच्या सदस्यांच्या शैक्षणिक विद्वतेसंदर्भात किंवा त्यांच्या पात्रतेसंदर्भात शंका निर्माण करणारे पुरावे सापडतात.
- दोन किंवा त्यापेक्षा अधिक नियतकालिकांचे संपादकीय मंडळ सारखेच आढळते.
- संपादक/परीक्षण समितीच्या सदस्यांची संख्या बऱ्याच वेळा अपुरी असते. विषयतज्ज्ञांच्या परवानगीशिवाय त्यांची नावे संपादक/परीक्षण मंडळावर टाकली जातात किंवा एखाद्या नामांकित विद्वानांच्या नावाचा उल्लेख किंवा फोटोचा उपयोग त्याचा नियतकालिकांमधून प्रकाशित होणाऱ्या लेखांशी काही संबंध असणार नाही या अटीस अधीन राहून केला जातो.
- प्रकाशकाकडून नियतकालिक आंतरराष्ट्रीय दर्जाचे आहे असे सांगितले जाते, पण संपादक मंडळाच्या सदस्यांमध्ये भौगोलिक विविधता आढळत नाही.
- संपादक मंडळ 'Gender Bias' असते. (उदा. स्त्रियांना संपादक मंडळावर नेमले जात नाही.)

## २. व्यवसाय व्यवस्थापन (Business Management)

**प्रेडटरी प्रकाशकाच्या संदर्भात :**

- प्रकाशन कार्यामध्ये पारदर्शीपणाचा अभाव आढळतो.
- प्रकाशकांनी नियतकालिकांचे 'Digital Preservation' करण्यासंदर्भात धोरण निश्चित केलेले नसते. त्यामुळे जेव्हा काही कारणांमुळे नियतकालिकांचे प्रकाशन थांबते त्यावेळी त्याचा सर्व आशय इंटरनेटवरून कायमचा नाहीसा होतो.
- सुरुवातीस लेखकांना प्रकाशन शुल्काची माहिती दिली जात नाही. संबंधित लेखकाचा लेख प्रकाशित झाल्यानंतर त्याचा अनपेक्षितपणे बिल पाठविले जाते.
- प्रकाशित आशयाचे 'Indexing' करण्यापासून 'Search Engines' ला रोखले जाते.
- पीडीएफ प्रलेखांचे 'Copy Proofs' (Locks) केल्यामुळे आशयाचे वाङ्मयचौर्य (Plagiarism) तपासता येणे कठीण होते.

## ३. प्रामाणिकपणा/सचोटी (Integrity)

- नियतकालिकाचे नाव व नियतकालिकाचे कार्य यामध्ये विसंगती आढळते.
- नियतकालिकाचे शीर्षक त्याचे योग्य मूळ ठिकाण दर्शवीत नाही. (उदा. नियतकालिकाच्या शीर्षकामध्ये जर "Canadian" or "Swiss" यासारखे शब्द वापरले असतील पण वास्तविकत: त्या नियतकालिकाशी संबंधित प्रकाशक, संपादक किंवा परीक्षण समितीच्या सदस्यांपैकी कोणीही Canada / Switzerland या देशातील नाही हे जेव्हा लक्षात येते तेव्हा अशा शीर्षकाबाबत संशय निर्माण होतो.
- प्रकाशक आपल्या प्रकाशनांसाठी स्वीकारलेल्या लेखांचे परीक्षण करण्यासंदर्भात अपात्र व्यक्तींना 'Spam Requests' पाठवितात.
- वेबसाईट किंवा E-mails च्या माध्यमातून प्रकाशक आपल्या एक किंवा अधिक नियतकालिकांसाठी 'Thomas-Reuters' या अधिकृत संस्थेने 'Impact Factor' दिल्याची खोटी माहिती संप्रेक्षित करतात किंवा



अनधिकृत संस्थेमार्फत मिळविलेल्या 'Impact Factor' ची जाहिरात करून आपल्या नियतकालिकांचा दर्जा उच्चतम असल्याचे दर्शवितात.

- आपल्या प्रकाशनांच्या आशयाचे कायदेशीररित्या असणाऱ्या 'Abstracting & Indexing' सेवांच्या माध्यमातून 'Indexing' झाले असल्याचा खोटा दावा प्रकाशकाकडून केला जातो किंवा प्रत्यक्षत: ज्या सेवा 'Abstracting & Indexing' स्वरूपाच्या नाहीत त्यांच्या माध्यमातून 'Indexing' झाले असल्याचा दावा प्रकाशकाकडून केला जातो.
- प्रकाशकांकडून आपल्या नियतकालिकांच्या माध्यमातून लेखकांकडून वारंवार होणाऱ्या वाङ्मयचौर्यासारख्या गैरप्रकारांबाबत (Misconduct) कोणतेही ठाम प्रयत्न करण्यात येत नाही.
- प्रकाशकांकडून लेखकांना त्यांचे लेख परीक्षण (Review) करून घेण्यासाठी परीक्षक (Reviewer) सुचविण्यास सांगितले जाते. लेखकांनी सुचविलेल्या परीक्षकांच्या शैक्षणिक पात्रतेची किंवा सत्यतेची खात्रीही प्रकाशकांकडून केली जात नाही.

## ४. इतर निकष (Other)

**प्रेडटरी प्रकाशक म्हणजे असे प्रकाशक जे :**

- पूर्वी इतर प्रकाशनांच्या माध्यमातून प्रकाशित झालेले लेख योग्य ते श्रेय न देता पुनर्प्रकाशित करतात.
- अगदी नवीनच असतानादेखील आणि 'आघाडीचे प्रकाशक' आहोत अशी वल्गना करतात.
- विकसनशील देशांमधील लेखकांना आकर्षित करण्याच्या हेतूने पाश्चिमात्य देशांमधून आपला प्रकाशन व्यवसाय चालवितात किंवा पाश्चिमात्य देशांचे खोटे टपाल पत्ते वापरून लेखकांची फसवणूक करतात.
- लेखांचे मुद्रितशोधन (Proofreading) व प्रतसंपादन (Copyediting) योग्यरित्या किंवा अजिबातच करीत नाहीत.
- शैक्षणिक दर्जा नसलेले लेख प्रकाशित करतात.

- प्रकाशक आपल्या वेबसाईटवर 'संपर्क' (Contact Us) या मेन्यूमध्ये ठिकाण निर्देशित न करता ई-मेल आय.डी. आणि वेबसाईट फक्त उल्लेख करतात.

**५. सर्वसाधारण/अल्प दर्जा असणारी नियतकालिके (Poor Journal Standards)**

- किरकोळ संपादन सोपस्कर करून प्रकाशक इतर प्रकाशकांच्या 'Author guidelines' चा वापर करतात.
- प्रकाशकांकडून मुख्य संपर्क कार्यालयाचे ठिकाण, संपर्क पत्ता, इ.बाबत अपुरी माहिती पुरविली जाते.
- अधिकाधिक लेखांच्या माध्यमातून लेखकांकडून पैसे उकळण्याच्या हेतूने प्रकाशकांकडून ढोबळ स्वरूपाची नियतकालिके प्रकाशित केली जातात.
- दोन किंवा अधिक विषय शाखांचा समावेश असणारी नियतकालिके प्रकाशकांकडून प्रकाशित केली जातात. (उदा. International Journal of Business, Humanities and Technology)
- प्रकाशक लेखकांकडून लेख प्रकाशित करण्यासाठी पैसे घेतात.
- प्रकाशक कॉपीराईट कायद्याचे उल्लंघन करून इंटरनेटवरील 'Licensed Images' चा वापर आपल्या प्रकाशनांसाठी करतात.
- प्रकाशकांच्या वेबसाईटवरील माहितीमध्ये व्याकरणाच्या चुका व अनेक Dead Links आढळतात. वेबसाईट योग्यरित्या Maintain केली जात नाही.
- प्रकाशक 'Spam E-mails' च्या माध्यमातून लेखकांना लेख पाठविण्यासंदर्भात/संपादकीय मंडळाचे सदस्यत्व स्वीकारण्यासंदर्भात आवाहन करतात.
- प्रकाशकांच्या अधिकारी वर्गाकडून जी-मेल, याहू यांसारख्या मोफत ई-मेल सेवांचा वापर केला जातो.
- प्रकाशकांकडून ISSN / DOI यांसारख्या क्रमांकाचा वापर किंवा योग्य वापर केला जात नाही.



- एखादा आक्षेपार्ह लेख मागे घेण्यासंदर्भात किंवा त्यामध्ये दुरुस्ती करण्यासंदर्भात प्रकाशकांकडून योग्य ती भूमिका घेतली जात नाही किंवा धोरण ठरविले जात नाही.
- प्रकाशकांच्या नावामध्ये "Network", "Centre", "Association", "Institute" यासारख्या शब्दांचा वापर केला जातो. या शब्दांचा असणारा व्यापक अर्थ आणि प्रकाशकांचे कार्य यामध्ये विसंगती आढळते.
- प्रकाशकांच्या वेबसाईटवर अनेक प्रकारच्या जाहिराती आढळतात, त्यामुळे आशय पाहणे, शोधणे यामध्ये अनेकदा अडचण निर्माण होते.
- प्रेडटरी प्रकाशकांची उद्योग संस्थांमध्ये सदस्यता असत नाही.
- जलत प्रकाशन, परीक्षण यासारख्या विधानांचा वापर प्रकाशकांकडून केला जातो.
- प्रकाशक संशोधन लेखांचे अधिकृत परीक्षण करीत नसल्याचे अनेक पुरावे सहज सापडतात.
- 'Article Processing Fee' या नावाखाली कोणतीही सेवा न पुरवता लेखकांकडून पैसे उकळतात.
- दर्जेदार नियतकालिक निर्देशिकांमध्ये प्रेडटरी प्रकाशनांचा समावेश केला जात नाही किंवा ग्रंथालय डाटाबेसेसमार्फत त्यांचे तालिकीकरण केले जात नाही.
- प्रेडटरी प्रकाशक आपल्या वेबसाईटवर ओपन ॲक्सेस मुव्हमेंटचे महत्त्व अधोरेखित करणारे लिखाण प्रकाशित करून आपण त्यास कशी बळकटी देत आहोत हे दाखवून देण्याचा प्रयत्न करतात.
- प्रकाशक लेखांचे परीक्षण (Peer Review) जलद करून देण्यासंदर्भात 'Fast-Track' सेवांच्या माध्यमातून लेखकांकडून पैसे उकळतात.
- बऱ्याचवेळा प्रेडटरी नियतकालिकांच्या संपादकीय मंडळावरील सदस्यांचा नियतकालिकांमध्ये एकही संशोधन लेख प्रकाशित नसतो.
- प्रेडटरी प्रकाशन इतर प्रकाशकांच्या नियतकालिकांच्या शीर्षकांचा वापर आपल्या नियतकालिकांसाठी करतात.

## प्रेडटरी प्रकाशकांना आळा घालण्यासाठी सुचविलेल्या काही उपाययोजना

वरील मुद्यांचा काळजीपूर्वक अभ्यास करता भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेसमोर गंभीर समस्या म्हणून उभा राहिलेल्या प्रेडटरी प्रकाशकांना वेळेत लगाम लावण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग, विद्यापीठ, शिक्षक व संशोधक आणि ग्रंथपाल यांच्या अनुषंगाने काही उपाययोजना सुचविल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे :

### १. विद्यापीठ अनुदान आयोग (यू.जी.सी.)

- विद्यापीठ अनुदान आयोगाने 'शिक्षक' या संवर्गाच्या ए.पी.आय. प्रणालीमध्ये 'संशोधन' या घटकांतर्गत समाविष्ट 'Activity' बाबत योग्य ते स्पष्टीकरण देणे गरजेचे आहे. उदा. राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय नियतकालिक म्हणजे काय? Refereed / Non-Refereed नियतकालिक म्हणजे काय? ते ठरविण्याचे निकष कोणते, इ. यामुळे या घटकाबाबत शिक्षक व संशोधकांमध्ये असणारा गोंधळ कमी होईल.
- एन. वसंता राजू (२०१३) यांनी सुचविल्याप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रेडटरी प्रकाशक ओळखून त्यावर निर्बंध घालविण्यासाठी एक प्रभावी यंत्रणा विकसित करण्याची गरज आहे.

### २. विद्यापीठ

- विद्यापीठांनी आपल्या वेबसाईटवर शिक्षक आणि संशोधकांसाठी Upolad केलेल्या नियतकालिकांच्या याद्यांमध्ये प्रेडटरी नियतकालिकांचा समावेश नसल्याची तत्काळ खात्री करू द्यावी.
- विद्यापीठांची दर्जेदार नियतकालिकांच्या यादीमध्ये काही वेळा नियतकालिकांचे नाव न देता 'Any Journal with ISSN' असे नमूद केल्याचे आढळते व यातूनच चुकीचा अर्थबोध होऊन संशोधक प्रेडटरी प्रकाशकांच्या भूलथापांना बळी पडण्याची शक्यता निर्माण होते, त्यामुळे विद्यापीठांनी यासारख्या बाबी टाळाव्यात.



### ३. शिक्षक व संशोधक

- शिक्षक आणि संशोधकांनी लेखांच्या संख्येपेक्षा लेखांच्या दर्जाला अग्रक्रम द्यावा व प्रेडटरी प्रकाशकांच्या भूलथापांना बळी न पडता दर्जेदार नियतकालिकांमध्ये संशोधन लेख प्रकाशित करावेत.
- प्रेडटरी प्रकाशकांच्या संपादक/परीक्षण मंडळावर सदस्य म्हणून काम करू नये.

### ४. ग्रंथपाल

- ग्रंथपालांनी वैयक्तिक मार्गदर्शन, माहिती साक्षरता कार्यक्रम इ.च्या माध्यमातून शिक्षक आणि संशोधकांना प्रेडटरी प्रकाशनांमध्ये लेख प्रकाशित करण्यापासून परावृत्त करावे.

## निष्कर्ष

जेफ्री बेलचे प्रेडटरी प्रकाशकनिश्चितीचे निकष, त्याच्या http://scholarlyoa.com/ या वेबसाईटवरील प्रेडटरी प्रकाशक आणि प्रेडटरी नियतकालिकांच्या याद्या व वरील सुचविलेल्या काही उपाययोजनांच्या साहाय्याने भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेसमोर उभ्या ठाकलेल्या प्रेडटरी प्रकाशकांच्या समस्येवर मात करता येऊ शकते.

## संदर्भ

Beall, J. (2015). Criteria for Determining Predatory Open-Access Publishers. Scholarly Open Access. Retrieved 27 November 2015, from http://scholarlyoa.com/

Machovec, G. (2013). An Interview with Jeffrey Beall on Open Access Publishing.

Charleston Adv, 75(1), 50-50. http://dx.doi.org/10.5260/chara.15.1.50

Raju, N. (2013). How does UGC identify predatory journals?. Current Science, 104(11), 1461-1462.

**Suggested Reading**

Beall, J. (2013). Predatory publishing is just one of the consequences of gold open access. Learned Publishing, 26(2), 79-83. http://dx.doi.org/10.1087/20130203

Lakhotia, S. (2015). Predatory journals and academic pollution. Current Science, 705(8), 1407-1408.

Tin, L, Ivana, B., Biljana, B., Ljubica, I., Dragan, M., & DuAjan, S. (2014). Predatory and Fake Scientific Journals/ Publishers -A Global Outbreak with Rising Trend: A Review.

Geographica Pannonica, 75(3), 69-81. Retrieved from http://dgt.pmf.uns.ac.rs/pannonica/papers/volume 18_3_3 .pdf



# डी. जी. रूपारेल महाविद्यालय 'पुस्तक पेढी' योजना : एक पाहणी

**सचिन गराटे**
डी.जी. रूपारेल महाविद्यालय, ग्रंथालय
माटुंगा, मुंबई
garate.sachin@gmail.com

*प्रस्तुत अभ्यासाचा हेतू 'पुस्तकपेढी' सुविधेबाबत वापरकर्त्यांच्या अपेक्षा, समाधान जाणून घेणे; सदर सुविधा पुरवीत असताना भेडसावणाऱ्या अडचणींवर उपाययोजना सुचवून सेवा अधिक सुकर करण्याचे मार्ग शोधणे हा आहे. वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करून शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये सदर सेवेच्या मागणी केलेल्या विद्यार्थ्यांकडून प्रश्नावलीद्वारे माहिती गोळा करण्यात आली. प्राप्त झालेल्या २०५ प्रश्नावलींद्वारे माहितीच्या विश्लेषणावरून मांडलेले निष्कर्ष दर्शवतात की, विद्यार्थी सदर सेवेबाबत समाधानी आहेत. तसेच या सेवेत पुरविल्या जाणाऱ्या पुस्तकांच्या उपयुक्ततेबाबतही विद्यार्थी समाधान व्यक्त करतात. विद्यार्थ्यांनी केलेल्या सूचना, प्राप्त निष्कर्ष तसेच ग्रंथालयाने सेवा अधिक तत्परतेने देता यावी म्हणून सुचविलेल्या पर्यायांचा विचार करून 'पुस्तकपेढी' सेवेच्या सुधारणेकरिता शिफारशी करण्यात आल्या आहेत.*

## प्रस्तावना

वापरकर्त्यांना पुरविण्यात येणाऱ्या सेवांबाबत त्यांचे समाधान हे त्या सेवेच्या योग्यतेबद्दल दिलेला दाखला असतो. ग्रंथालयाने देऊ केलेल्या सेवा त्यांच्या वापरकर्त्यांना समाधानकारक वाटतात का? या सेवांबाबत त्यांच्या काय अपेक्षा आहेत? सेवेत गुणवत्ता आणण्याकरिता काही सूचना आहेत का? आणि मुळात ते या सेवांचा वापर करतात का? इत्यादी बाबी जाणून घेऊन सेवेचे मूल्यमापन करणे व त्यात आवश्यक बदल करणे हे विशिष्ट सेवेच्या गुणात्मक प्रगतीचे चिन्ह असते.

'पुस्तकपेढी' योजनेमध्ये संस्थेतील विद्यार्थ्यांना ठराविक मुदतीकरिता वा पूर्ण शैक्षणिक वर्षाकरिता पुस्तकांचा संच वापरण्यास दिला जातो. सदर सेवा ही बऱ्याचदा नि:शुल्क असते. आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक पुस्तकांच्या

माध्यमातून मदत करण्याच्या हेतूने या सुविधेची आखणी केलेली असते. एस. पी. गोयल आणि व्ही. के. जोशी यांनी दिलेल्या व्याख्येतून 'पुस्तकपेढी'ची संज्ञा स्पष्ट होते.

"Book Bank" is an office or quarters for receiving and lending text books to the needy students for a certain period, to use as their own paying norminal rentals and observing other rules laid down for the purpose.'

## रूपारेल महाविद्यालयातील 'पुस्तकपेढी' योजना

डी. जी. रूपारेल महाविद्यालय, मुंबई या महाविद्यालयात गेल्या ३० वर्षांपासून 'पुस्तकपेढी' योजना राबविण्यात येते. गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्याचे धोरण व्यवस्थापनाने सुरुवातीपासूनच स्वीकारले आहे. गरजू विद्यार्थ्यांना फीमध्ये सवलत, पुस्तकांच्या रूपाने मदत, विविध शिष्यवृत्त्या राबवून सामाजिक बांधिलकीची जपणूक महाविद्यालय करते. सुरुवातीची १९ वर्षे महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने आर्थिक भार स्वीकारला. सन २००३ पासून मुंबई विद्यापीठाद्वारे दिल्या जाणाऱ्या 'मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता पुस्तकपेढी योजने'चा समावेशही महाविद्यालयाने केला. सध्या 'आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांकरिता (खुला व इ.मा.व) पुस्तकेढी' आणि 'मुंबई विद्यापीठाची मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता पुस्तकपेढी (अनुसूचित जाती, जमाती, भटक्या प्रवर्ग)' या दोन्ही योजना एकत्रित राबवण्यात येतात. या दोन्ही योजना राबविताना ग्रंथालयाने राबवायची कार्यवाही, विद्यार्थ्यांनी पाळावयाचे नियम, एकूण दोन्ही योजनांची नियमावली तयार केली आहे. वेळो-वेळी योजनेच्या अंमलबजावणीमध्ये आवश्यक ते बदल करून सेवा अधिक चांगली करण्याचा प्रयत्न ग्रंथालयाने केला आहे. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये पुस्तकपेढी योजनेची मागणी केलेल्या विद्यार्थ्यांकडून सदर सेवेची माहिती गोळा करून ही सेवा खरोखरच उपयुक्त ठरतेय का? वापरकर्ते समाधानी आहेत का? याची पाहणी करण्यात आली.

ग्रंथालयाने 'पुस्तकपेढी' योजनेच्या कार्यपद्धतीमध्ये वेळोवेळी बदल केले असले तरी, ग्रंथालयाला अजूनही बऱ्याच व्यवस्थापकीय अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. या अडचणींवर मात करून काही मार्ग शोधता येतील का? याचाही विचाराधीन ग्रंथालय आहे. मुंबई विद्यापीठाकडून मिळणारे अनुदान, त्याची प्रक्रिया, विद्यापीठाने अवलंबविलेला सत्र पद्धतीचा अभ्यासक्रम, पुस्तकांच्या वाढत्या किमती, सदर योजनेकरिता मिळणारा विद्यार्थ्यांचा प्रतिसाद, कर्मचाऱ्यांची कमतरता आदी प्रशासकीय



अडचणी तसेच विद्यार्थ्यांनी अर्जामध्ये नोंदविलेल्या पुस्तकांच्या अपूर्ण, चुकीच्या संदर्भ याद्या, त्याकरिता त्यांना आवश्यक असलेल्या पुस्तकांचा शोध, त्यावर हकूम पुस्तक खरेदी या बाबी अत्यंत वेळखाऊ बनल्या आहेत. अशा स्थितीत विद्यार्थ्यांना वेळेत म्हणजे शैक्षणिक वर्षाच्या सत्र अभ्यासक्रम सुरुवातीसच पुस्तकांचे वितरण करणे शक्य होत नाही. यात उपाययोजना म्हणून काही पर्यायांची अंमलबजावणी व विद्यार्थ्यांकडून त्याची पडताळणी हाही या अभ्यासाचा भाग आहे.

## 'पुस्तकपेढी' व्यवस्थेतील अडथळे

१. दरवर्षी महाविद्यालयात दाखल होणाऱ्या व त्या-त्या इयत्तेत शिकणाऱ्या एकूण विद्यार्थिसंख्येच्या तुलनेत 'पुस्तकपेढी'साठी मागणी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण समाधानकारक नसते.

२. विद्यार्थ्यांनी मागणी केलेल्या पुस्तकांच्या अर्जामध्ये केलेले उल्लेख बरेचदा अपूर्ण व चुकीचे असतात. अशा अर्धवट माहितीवर (Bibliographical Details) आधारून पुस्तकांचा शोध घेणे व विद्यार्थ्यांना सेवा जलद देणे शक्य होत नाही.

३. सदर सुविधा उत्तमरित्या राबविण्याकरिता ग्रंथालयाला कर्मचाऱ्यांचा तुटवडा जाणवतो.

४. सदर सुविधेकरिता मुंबई विद्यापीठाकडून मिळणाऱ्या अनुदानाबाबत ग्रंथालय वर्षअखेरपर्यंत अनभिज्ञ असते. अनुदान मिळेल अथवा नाही? मिळाले तर त्याची रक्कम किती असेल? याची माहिती नसल्याने खर्च करायच्या रकमेचा अंदाज घेता येत नाही.

५. मनुष्यबळाअभावी नवीन पुस्तक खरेदी, त्याचे ग्रंथालयीन सोपस्कार वेळेत पूर्ण करता येणे शक्य होत नाही. परिणामी विद्यार्थ्यांना त्यांच्या उपयोगाच्या वेळी पुस्तक पुरविणे कठीण जाते.

६. पुस्तकांच्या वाढत्या किमती आणि अर्जदारांची संख्या पाहता, उपलब्ध निधीमध्ये जास्तीतजास्त पुस्तकांचे वाटप करणे शक्य होत नाही.

## उद्देश

'पुस्तकपेढी' योजनेच्या कार्यपद्धतीत सुधारणा व्हावी व लाभार्थ्यांची मते जाणून घेणे या उद्देशाने सदर अभ्यास हाती घेण्यात आला आहे. खाली नमूद केलेल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेकरिता पाहणी करण्यात आली.

१. सदर योजनेची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याकरिता उपलब्ध मार्गांबद्दल जाणून घेणे.

२. या योजनेतून त्याच्या वापरकर्त्यांचे समाधान होते की नाही हे जाणून घेणे.

३. सदर सुविधेतून दिल्या जाणाऱ्या पुस्तकांच्या उपयुक्ततेबाबत वापरकर्त्यांची मते जाणून घेणे.

४. सदर सेवेच्या कार्यवाहीतील अडचणी जाणून घेणे.

५. सदर सेवेच्या सुरळीत कार्यवाहीकरिता वापरकर्त्यांच्या ग्रंथालयाकडून असलेल्या अपेक्षा जाणून घेणे. त्यांच्या सूचना जाणून घेणे.

६. 'पुस्तकपेढी' योजनेत मिळू शकणाऱ्या पुस्तकांच्या प्रस्तावित यादीत समाविष्ट करता येतील अशा पुस्तकांच्या पर्यायांची क्रमवारता जाणून घेणे.

## व्याप्ती

डी. जी. रूपारेल महाविद्यालय, मुंबई येथील ग्रंथालयात राबविल्या जाणाऱ्या 'पुस्तकपेढी' योजनेत सदर अभ्यास मर्यादित आहे. सदर महाविद्यालयात वर्ष २०१४–१५ मध्ये शिकणाऱ्या आणि 'पुस्तकपेढी' सुविधेकरिता मागणी केलेल्या विद्यार्थ्यांकडून पाहणी करण्यात आली आहे.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत अभ्यासाकरिता वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. माहिती गोळा करण्याकरिता प्रश्नावली साधनांचा वापर करण्यात आला. प्राप्त माहितीचे संगणकाद्वारे (एक्सेल) विभाजन करून विवेचन करण्यात आले.

'पुस्तकपेढी' योजनेची मागणी केलेल्या विद्यार्थ्यांना अर्जासोबत प्रश्नावलीचे वितरण करण्यात आले. 'पुस्तकपेढी'चा अर्ज ग्रंथालयात सादर करतेवेळी वितरित केलेल्या प्रश्नावलीही घेण्यात आल्या. प्राप्त झालेल्या २०५ प्रश्नावलींच्या आधारे सदर विवेचन करण्यात आले.

'पुस्तकपेढी' योजनाही कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता राबविली जात नसल्याने, प्रथम वर्ग कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी या सुविधेचा याआधी लाभ घेतला असण्याची शक्यता नाही. त्यामुळे प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांच्या या सुविधेबाबतचे समाधान, पुस्तकांची उपयुक्तता याकरिता कोणतेही प्रतिसाद ग्राह्य धरलेला



नाही, परंतु अर्ज भरताना येणाऱ्या अडचणी, संभाव्य अपेक्षा आदींबाबत त्यांचा प्रतिसाद ग्राह्य समजला गेला आहे.

## पूर्वाभ्यासाचा शोध

शैक्षणिक ग्रंथालयात पुरविल्या जाणाऱ्या सेवांविषयी वापरकर्त्याचे समाधान जाणून घेऊन गरज भासल्यास त्यात सुधारणेकरिता सूचना करणारे अनेक अभ्यास आत्तापर्यंत केले गेले आहेत. वापरकर्त्यांचे समाधान हे त्यांना पुरविल्या गेलेल्या सेवेच्या, सुविधेच्या गुणवत्तेशी निगडित असते. सेवेचे गुणवत्ता सातत्याने सुधारित ठेवणे हे त्या सेवादात्याचे काम असते. ग्रंथालयातील अनेक जाणकार व व्यावसायिक व्यक्तींनी सेवा आणि वापरकर्त्यांचे समाधान याबाबतचे विविध मुद्दे त्यांच्या अभ्यासात मांडले आहेत.

वापरकर्त्यांच्या माध्यमातून केलेल्या या अभ्यासात ग्रंथालयाचे वाचन साहित्य, सेवा–सुविधा, सेवक वर्ग याबाबतीत वापरकर्ते एकत्र ठराविक पातळीपर्यंत आपले समाधान नोंदवतात. लेखकांनी वापरकर्त्यांच्या समाधानकारकतेच्या पातळ्यांचे मोजमाप केले. देवघेव सेवा, संदर्भग्रंथाची उपलब्धता याबाबतीत वापरकर्ते जरी पूर्णत: समाधान दर्शवीत असले तरी इतर उर्वरित सेवांच्या बाबतीत ते आपले पूर्णत: समाधान दर्शवीत नाहीत. आपल्या सूचना नोंदविताना त्यांनी काही व्यवस्थापकीय अडचणींची नोंद केली आहे. या अडचणींवर ग्रंथालयांनी अधिक लक्ष पुरवावे असे लेखक सुचवितात. कदाचित याच कारणांमुळे ते ग्रंथालयाच्या काही सेवांबाबत पूर्ण समाधानी नसावेत, असे लेखक सुचवितात.

Onuoha, Omokaje and Bamidele, २०१३ यांनी केलेल्या पाहणीत वापरकर्ते ग्रंथालयातील दृकश्राव्य सेवेचा वापर कमी करतात असे आढळले. यामागचे कारणही ते नोंदवतात. सदर सेवेबद्दल ते जागरूक नाहीत याची नोंद लेखक करतात. ग्रंथालयाने विद्यार्थ्यांकरिता विविध सूचना, कार्यक्रम, E-mails द्वारे सेवांची प्रसिद्धी करावी असे लेखक सुचवितात.

## विश्लेषण

### १. प्रतिसाद

शैक्षणिक वर्ष २०१४–१५ साठी एकूण २०५ विद्यार्थ्यांनी 'पुस्तकपेढी' योजनेकरिता मागणी केली. या सर्व विद्यार्थ्यांकडून प्रश्नावली भरून घेण्यात आली.

| विद्याशाखा | कला | वाणिज्य | विज्ञान | आय टी | बी.एम.एस. | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| प्रतिसाद | १७ | ८४ | ३६ | ४९ | १९ | २०५ |

**तक्ता क्र. १ :** शाखानिहाय प्रतिसाद

| वर्ष | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | तृतीय वर्ष | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्रतिसाद | ९४ | ४८ | ६३ | २०५ |

**तक्ता क्र. २ :** प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षानुसार प्रतिसाद

याबाबत वापरकर्त्याचे समाधान व अपेक्षा जाणून घेण्यात आल्या आहेत. तसेच एका विशिष्ट सेवेचाही अशाप्रकारे अभ्यास करण्यात आला आहे. यात आंतरग्रंथालयीन देवघेव, देवघेव सेवा, इंटरनेट व त्याच्याशी निगडित सुविधा, वेबसाईट, इत्यादींचा समावेश होतो. 'पुस्तकपेढी' योजनेवर मात्र असे अभ्यास फार झालेले आढळत नाहीत.

Goyal and Joshi, 1981 यांनी 'हरियाणा ॲग्रिकल्चर विद्यापीठात' राबविल्या जाणाऱ्या पुस्तकपेढी योजनेचा अभ्यास (Case Study) केला. मागील दहा वर्षांमध्ये पुस्तकपेढी योजनेतील पुस्तकांच्या संख्येत वार्षिक झालेली वाढ, योजनेसाठी विद्यार्थ्यांकडून आकारल्या जाणाऱ्या शुल्कामध्ये झालेली वाढ आणि गेल्या पाच वर्षांत सदर पुस्तकांचा झालेला वापर याचे मूल्यमापन सादर केले आहे. सदर योजनेच्या वापरामध्ये दरवर्षी एकूण पुस्तकांपैकी काही पुस्तके विद्यार्थ्यांकडून मागणी न आल्याने शिल्लक राहातात. या शिल्लक पुस्तकांना मात्र मुख्य ग्रंथालयामध्ये मागणी असल्याचे निदर्शनात आल्याने यापुढे अशी पुस्तके मुख्य ग्रंथालयात तात्पुरत्या वापराकरिता वळविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय ग्रंथालयाने घेतल्याचे नोंदविण्यात आले आहे. सदर अभ्यासात लेखकांनी विद्यार्थ्यांकडून आकारले जाणारे शुल्क घेऊ नये. शिल्लक असलेली शुल्काची रक्कम मागणी असलेल्या पुस्तकांच्या जादा प्रती घेण्याकरिता वापरण्यात यावी, अशा सूचना केल्या आहेत.

Motiang, Walls and Karodia, 2014 यांनी केलेल्या पाहणीत साऊथ आफ्रिकेतील लिंपोवो विद्यापीठातील ग्रंथालय वापरकर्त्यांच्या समाधानकारकतेचे मूल्यमापन केले. वापरकर्त्यांनी दिलेल्या प्रतिसादातून ते ग्रंथालयाद्वारे परविल्या जाणाऱ्या सेवांबाबत समाधानी दिसतात, परंतु काही प्रतिसाद आपले असमाधान व्यक्त करतात. सेवांबाबत असमाधान दर्शविणारे वापरकर्ते कमी असले तरी, लेखक त्याकडे अधिक लक्ष पुरविण्याची सूचना ग्रंथालयाला करतात.

Godi, Paradkar and Deshpande, 2014 यांनी 'राजर्षि शाहू इंजिनीअरिंग, पुणे' ग्रंथालयातील वापरकर्त्यांचे समाधान जाणून घेण्याकरिता केलेल्या अभ्यासात



सेवांच्या तक्ता क्र. १ वरून लक्षात येते की, वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा प्रतिसाद अधिक आहे. पुस्तकपेढी योजनेकरिता मागणी करणारे विद्यार्थी हे वाणिज्य शाखेतून अधिक आहेत. महाविद्यालयात दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांची शाखानिहाय विद्यार्थिसंख्या लक्षात घेता हे प्रमाण योग्यच वाटते. त्याखालोखाल 'आयटी' या सेल्फ फायनान्स शाखेतील विद्यार्थी पुस्तकपेढीची मागणी करतात. या शाखेतील अभ्यासक्रमाची पुस्तके महाग असल्याने बरेचसे विद्यार्थी ग्रंथालयातील पुस्तकांवर अवलंबून असतात. परिणामी पुस्तकपेढीची मागणी करणारेही अधिक दिसतात.

तक्ता क्र. २ दर्शवितो की, पुस्तकपेढीकरिता प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी अधिक मागणी केली आहे. हे प्रमाण निम्म्याहून अधिक आहे. आधीच नमूद केल्याप्रमाणे प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचा प्रश्नावलीतील प्रतिसाद हा काही ठराविक प्रश्नांकरिताच ग्राह्य धरता येणार आहे.

वर्ष २०१४-१५ मध्ये एकूण ६४१ विद्यार्थी मागासवर्गीय विभागात (एस.सी., एस.टी. आणि व्ही.जे.एन.टी.) शिकत होते. त्यापैकी केवळ १८५ विद्यार्थ्यांनी या पुस्तकेढीकरिता मागणी केली होती. उर्वरित २० विद्यार्थी खुला व ओबीसी प्रवर्गातील होते. मुंबई विद्यापीठाच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता असलेल्या या पुस्तकपेढीकरिता कोणत्या इतर अटी शर्ती नसताना एकूण मागासवर्गीय विद्यार्थ्यांपैकी केवळ १८५ (२८%) विद्यार्थी मागणी करतात. हे प्रमाण अत्यंत अल्प जाणवते.

## २. 'पुस्तकपेढी' योजनेची जागरूकता :

| योजनेची प्रसिद्धी | सूचना फलक | सहकारी विद्यार्थ्यांकडून | शिक्षकांकडून सूचना |
|---|---|---|---|
| प्रतिसाद | १४३ | ३७ | ३० |
| | ६८% | १८% | १४% |

**तक्ता क्र. ३ :** योजनेची प्रसिद्धी

'पुस्तकपेढी' योजनेला भविष्यात अधिक प्रतिसाद मिळावा व जास्तीतजास्त विद्यार्थ्यांना फायदा व्हावा या दृष्टीने योजनेची प्रसिद्धी कशी करता येईल व त्याकरिता नेमके कोणते मार्ग अधिक उपयुक्त ठरतील हे जाणून घेणे आवश्यक होते. विद्यार्थ्यांमध्ये कुठल्या मार्गाने या सुविधेची प्रसिद्धी अधिक होते हे जाणून घेण्याकरिता विचारलेल्या प्रश्नांत विद्यार्थी नोटीस बोर्ड या मार्गाची उपयुक्तता अधिक सुचवितात. ६८% मतांनी नोटीस बोर्ड, १८% मतांनी आपल्या सहकाऱ्यांकडून, तर सगळ्यात कमी

म्हणजे १४% मतांनी शिक्षकांकडून सूचना मिळाल्याचे सांगतात. यात काही विद्यार्थ्यांना एकापेक्षा अधिक मार्गांनीही सूचना मिळाल्याचे नोंदवतात.

### ३. 'पुस्तकपेढी' योजनेबद्दल लाभार्थ्यांचे समाधान

| | समाधानी आहेत | असमाधानी | प्रथमच वापर करणारे जे मत नोंदवत नाहीत | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्रतिसाद | ९०<br>८२% | ३<br>३% | १८<br>१५% | १११<br>१००% |

**तक्ता क्र. ४ :** लाभार्थ्यांचे समाधान

सदर प्रतिसादामध्ये प्रथम वर्षाच्या ९४ विद्यार्थ्यांचा समावेश नाही. उरलेल्या एकूण १११ लाभार्थ्यांपैकी ८२% लाभार्थी सदर सुविधेबाबत समाधानी असल्याचे नोंदवतात, तर ३% लाभार्थी आपण असमाधानी असल्याचे नोंदवतात. १५% लाभार्थी आपण प्रथमच अर्ज करत असल्याने मूल्यमापन करता येणार नाही असे सांगतात. असमाधान व्यक्त करणारे लाभार्थी विविध कारणांची नोंद करतात. जसे की, पुरविली गेलेली पुस्तके नवीन आवृत्तीची नसणे, मागणी केलेल्या यादीप्रमाणे पुस्तके न मिळणे, इ. एकूणात या सुविधेबाबत अधिक लाभार्थी समाधान असल्याचे दिसते.

### ४. पुस्तकांची उपयुक्तता

| पुस्तकांची उपयुक्तता | होय | नाही | प्रथमच वापरकर्ते जे मत नोंदवीत नाहीत | एकूण |
|---|---|---|---|---|
| | ९२<br>८४% | ०१<br>१% | १८<br>१५% | १११<br>१००% |

**तक्ता क्र. ५ :** पुस्तकांची उपयुक्तता

सदर प्रतिसादामध्ये प्रथम वर्षाच्या ९४ विद्यार्थ्यांचा समावेश नाही. सदर योजनेमध्ये देण्यात येणारी पुस्तके विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरतील याच प्रयत्नाने दिली जातात. पुस्तकांचे वाटप करताना विद्यार्थ्यांनी मागणी केलेल्या पुस्तकांची यादी, ग्रंथालयाकडे उपलब्ध असलेली पुस्तके, खर्च करावयाची एकूण रक्कम (ज्यातून नवीन पुस्तकांची खरेदी करता येईल) या सगळ्यांचा मेळ घालून पुरविली जातात. बऱ्याचवेळा विद्यार्थ्यांनी पुरविलेल्या याद्या चुकीच्या व अपूर्ण असल्याने त्यावर आधारून पुस्तकांचा शोध व खरेदी वेळखाऊ ठरते. ग्रंथालय पुरवीत असलेली पुस्तके त्यांच्या यादीप्रमाणे सगळीच



तंतोतंत जुळणारी नसतात. या पुस्तकांच्या उपयुक्ततेबाबत मिळालेला प्रतिसाद तक्ता क्र. ५ मध्ये दर्शवला आहे. ८४% लाभार्थी पुस्तकांच्या उपयुक्ततेवर शिक्कामोर्तब करतात, तर केवळ १% विद्यार्थी विरोधी मत नोंदवतात.

### ५. पुस्तकपेढीचा अर्ज भरतेवेळी येणाऱ्या अडचणी

सदर योजनेच्या मागणीसाठी अर्ज भरताना विद्यार्थ्यांना अडचणी येतात का? या प्रश्नाला ७८.५३% विद्यार्थी सदर अर्ज सुटसुटीत असून भरण्यास सोपा असल्याचे नोंदवतात. ८.७१% विद्यार्थी अर्जात पुस्तकांचे विवरण लिहिताना अपुरी जागा, तसेच दोन्ही सत्रांसाठीची पुस्तके नोंदविण्याची सोय नसल्याचे नोंदवतात.

| अर्ज भरतेवेळी अडचणीचा वाटतो का? | होय | नाही | कोणतेही मत नोंदवत नाहीत | एकूण |
|---|---|---|---|---|
| | १८<br>८.७९% | १६१<br>७८.५३% | २६<br>१२.६८% | २०५<br>१००% |

**तक्ता क्र. ६**

### ६. पुस्तकांची यादी लिहिताना शिक्षकांचे मार्गदर्शन

बुक बँक सुविधेतून मिळवीन अशी पुस्तके नोंदवताना विद्यार्थी नेमके काय करतात? नोंदविलेली पुस्तके त्यांना खरच आवश्यक असतात का? की ते ऐकीव माहितीच्या आधारे करतात? याचा आढावा घेण्यात आला. उपलब्ध पर्यायांपैकी शिक्षकवर्गाचे मार्गदर्शन या पर्यायाला विद्यार्थी अधिक दुजोरा देतात. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला आपण कोणती पुस्तके वापरावीत याबाबत विद्यार्थी अनभिज्ञ असतात. बरेच विद्यार्थी ऐकीव माहिती आधारे अपुरी, त्रोटक, चुकीची यादी सादर करतात. अशा चुकीच्या यादीमुळे पुस्तके उपलब्ध करून देताना ग्रंथालयाला अडचणी जाणवतात, असा अनुभव आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे मार्गदर्शन घेऊन सदर यादी करणे अपेक्षित असते. ५६% विद्यार्थी शिक्षकांशी संवाद साधून, त्यांचे मार्गदर्शन घेऊन याद्या तयार करतात, तर १६% विद्यार्थ्यांना अशा मार्गदर्शनाची गरज भासत नाही असे दिसून येते.

| शिक्षकांचे मार्गदर्शन | होय | नाही | मत नोंदविता येत नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| | ११५<br>५६% | ३१<br>१६% | ५९<br>२८% | २०५<br>१००% |

**तक्ता क्र. ७ :** शिक्षकांचे मार्गदर्शन

## ७. प्राधान्यक्रम यादी तयार करणे

शिक्षकांच्या मार्गदर्शनाने ७९% विद्यार्थी याद्या तयार करतात असे दिसत असले तरी नोंदविलेल्या याद्या अपुऱ्या, चुकीच्या असल्याचे आढळले. सदर सेवा सुरळीत, वेळेत राबवता यावी याकरिता नोंदविलेल्या पुस्तकांची यादी पूर्ण व योग्य तपशिलाची असायला हवी, असे ग्रंथालयाला वाटते. या सुविधेत उपलब्ध असलेल्या पुस्तकांची यादी विद्यार्थ्यांसमोर असेल तर ते अधिक सोईचे, वेळ वाचविणारे ठरेल या हेतूने ग्रंथालयाने एक यादी तयार करावी. या यादीमध्ये कोणत्या पुस्तकांचा समावेश करावा याची चाचपणी करण्यात आली. प्राधान्य क्रमाने मिळालेली पसंती तक्ता क्र. ६ मध्ये दिसते.

तक्ता क्र. ८ मध्ये असे दिसूत येते की, १०२ मते अभ्यासक्रमामध्ये शिफारस केलेल्या पुस्तकांचा समावेश करावा असे सुचवितात. २४ मते अभ्यासक्रमात शिफारस न केलेल्या इतर पुस्तकांच्या समावेशाचा पर्याय सुचवितात, तर २७ विद्यार्थी क्रमिक पुस्तकांच्या समावेशाला पर्याय म्हणून नोंदवतात. अभ्यासक्रमात शिफारस केलेल्या पुस्तकांच्या समावेशाला सर्वाधिक पसंती नोंदवतात, तर त्या खालोखाल क्रमिक पुस्तकांचा समावेश सुचवितात.

| प्राधान्यक्रम | क्रमिक पुस्तक | अभ्यासक्रमात समाविष्ट पुस्तक | इतर पुस्तक |
|---|---|---|---|
| प्रथम पसंती | ० | १०२ | ७ |
| द्वितीय पसंती | ५ | २ | २४ |
| तृतीय पसंती | २७ | ० | ४ |

**तक्ता क्र. ८ :** शिफारस यादी

## ८. सेवेत सुधार येण्याकरिता सूचना, मते

गेली ३० वर्षे सातत्याने पुरविल्या जाणाऱ्या बुक बँक सुविधेत कालानुरूप बदल होत गेले. आत्तापर्यंतचे बदल हे ग्रंथालयाने स्वत:च्या कुवतीने केलेले आढळतात. या



सेवेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सूचना, अपेक्षा, मते जाणून घेऊन सेवेत अधिक सुधारणेला वाव असल्याने विद्यार्थ्यांना सूचना करण्यास सांगण्यात आले. मिळालेल्या सूचनांची छाननी करून विद्यार्थ्यांची एकूण अपेक्षा खालीलप्रमाणे दिसली.

१. बुक-बँकची सेवा शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच जितक्या लवकर शक्य होईल तितक्या लवकर देण्यात यावी, असे सुचविण्यात आले.

२. नवीन शैक्षणिक धोरणानुसार वर्षभरात दोन विभागांचे (सेमिस्टर) शिक्षण विभागले जाते. दोन्ही सेमिस्टरसाठी एकाचवेळी पुस्तक देण्यात यावी असे सुचविण्यात आले.

३. वेळेत सेवा देता यावी याकरिता ग्रंथालयाने अधिक कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी, असे सांगण्यात आले.

४. शैक्षणिक शाखेनुसार व अभ्यासक्रमानुसार ग्रंथालयाने या सेवेत उपलब्ध असलेल्या व देऊ करता येतील अशा पुस्तकांची परिपूर्ण यादी तयार करावी. सदर यादी विद्यार्थ्यांनी अर्ज भरतेवेळी वापरावी असे सुचविण्यात आले.

## ९. निष्कर्ष

१. बुक-बँक सेवेची मागणी करणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या महाविद्यालयात शिकत असलेल्या एकूण विद्यार्थ्यांच्या तुलनेत खूपच कमी आढळते. मागणी केलेल्या विद्यार्थ्यांपैकी निम्म्याहून अधिक विद्यार्थ्यांना (६८%) या सेवेची माहिती सूचनाफलकाद्वारे मिळते.

२. लाभार्थ्यांपैकी ९०% विद्यार्थी सदर सेवेबाबत समाधान व्यक्त करतात. असमाधानी असलेल्या विद्यार्थ्यांनी दिलेल्या कारणांचा विचार करून सेवा अधिक सुकरपणे राबविणे शक्य आहे.

३. शक्यतो विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या पुस्तकांचेच वितरण केले जात असल्याने दिल्या जाणाऱ्या पुस्तकांच्या उपयुक्ततेबाबत ८४% विद्यार्थी समाधान व्यक्त करतात.

४. बुक-बँक योजनेची एकूण कार्यपद्धती, अर्जात नोंदवायची माहिती याबद्दल ९०% विद्यार्थी आपणास कार्यपद्धती सुकर व कोणतीही अडचण नसल्याचे नोंदवतात. तसेच ७९% विद्यार्थ्यांना सदर अर्ज भरताना शिक्षक वा इतर मार्गदर्शकांची गरज भासत नाही.

५. विद्यार्थ्यांनी केलेल्या सूचनांचा विचार करता, त्यांच्या या सेवेमार्फत असलेल्या अपेक्षा जाणून घेता येतील. सदर सूचनांपैकी ग्रंथालयाने या सेवेत देता येतील अशा पुस्तकांची सर्वसमावेशक यादी तयार करावी या सूचनेचा अधिक गांभीर्याने विचार करणे शक्य आहे. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच पुस्तकांची उपलब्धी, सेमिस्टरनुसार पुस्तकांची उपलब्धी आदी सूचनाही महत्त्वाच्या ठरतात.

६. बुक-बँक सेवेत उपलब्ध असणाऱ्या पुस्तकांची एक यादी तयार करावी हे ग्रंथालयाच्या विचाराधीन होते, परंतु या यादीत नेमकी कोणत्या पुस्तकांचा समावेश करावा याबद्दल आढावा घेणे आवश्यक होते.

ग्रंथालयाने केलेल्या या पाहणीत, दिलेल्या पर्यायांपैकी अभ्यासक्रमात शिफारस केलेल्या पुस्तकांना अधिक पसंती मिळाली आहे. त्याखालोखाल बाजारात उपलब्ध असलेल्या क्रमिक पुस्तकांना पसंती देतात, तर अभ्यासक्रमात समाविष्ट नसलेल्या इतर पुस्तकांना सगळ्यात शेवटचा पर्याय म्हणून सुचवितात.

## १०. शिफारशी

प्राप्त निष्कर्षाच्या आधारे खालील शिफारशी करण्यात येत आहेत.

### १. बुक-बँक योजनेची प्रसिद्धी

बुक-बँक योजनेचा आत्तापर्यंतचा प्रतिसाद पाहाता महाविद्यालयात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या तसेच सदर योजना ज्या विद्यार्थ्यांना मिळू शकते अशा एकूण विद्यार्थ्यांच्या तुलनेत खूपच कमी आहे. या योजनेचा लाभ घेऊ शकतील असे अनेक विद्यार्थी सदर योजनेची माहिती न मिळाल्याने वंचित राहत असण्याची शक्यता आहे. ग्रंथालयाला अशी शिफारस करण्यात येत आहे की, सदर योजनेची प्रसिद्धी शक्य त्या विविध मार्गांनी करून विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता वाढवावी. सदर योजनेची सूचना विद्यार्थ्यांच्या वर्गामध्ये निदर्शनास आणून देण्याबरोबरच शिक्षकांच्या मदतीने गरजू विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था करावी. विद्यार्थ्यांनी SMS, E-mails आदी मार्गांचाही अवलंब करावा.

### २. उपलब्ध पुस्तकांची सर्व समाविष्ट अशी यादी तयार करणे

विद्यार्थ्यांनी सुचविलेल्या प्राधान्यक्रमानुसार ग्रंथालयाने एक सर्वसमावेशक यादी तयार करावी. सदर यादी तयार करताना या योजनेत उपलब्ध असलेल्या व होऊ शकणाऱ्या पुस्तकांचा समावेश करावा. शिक्षकांच्या सहभागाने सदर यादी अधिक दर्जेदार करून



घेण्यासाठी ग्रंथालयाने पुढाकार घ्यावा. पुढील वर्षाचे अर्ज वितरित करण्यापूर्वी फलकावर वर्ग व विषयानुसार यादी प्रदर्शित करावी; जेणेकरून विद्यार्थ्यांना पुस्तकांची निवड यादी नोंदविताना मोलाची मदत होईल व अर्जामध्ये परिपूर्ण ग्रंथशीर्षकांची नोंद होईल.

### ३. सेमिस्टर पद्धतीनुसार ग्रंथाचे वाटप

मुंबई विद्यापीठाने सेमिस्टर पद्धतीचा अवलंब केल्याने दोन वेगवेगळ्या सेमिस्टरकरिता विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या व अधिकच्या पुस्तकांची गरज असते. ग्रंथालयाच्या मनुष्यबळाच्या अडचणी पाहाता वर्षाच्या सुरुवातीलाच दोन्ही सेमिस्टरकरिता पुस्तक वितरित केल्यास ग्रंथालयाला दुसऱ्या सत्रात पुन्हा सर्व कार्यवाही करण्याचे श्रम वाचतील व विद्यार्थ्यांनाही वेळेआधी पुस्तके प्राप्त होतील. ग्रंथालयाने उपलब्ध निधी दोन्ही सत्रांच्या पुस्तकांकरिता योग्य प्रमाणात वापरावा असे सुचविण्यात येत आहे.

## समारोप

उपरोक्त निष्कर्ष माध्यमातून, बुक-बँक या सेवेबाबत विद्यार्थी समाधानी आहेत असे दिसते, परंतु सुचविलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करून ही सेवा अधिक विद्यार्थीप्रिय करता येईल. ठराविक कालखंडाने विद्यार्थ्यांचे अभिप्राय नोंदवून या सेवेची विद्यार्थ्यांकडून पडताळणी करता येणे शक्य आहे. सर्वसमावेशक यादीमुळे विद्यार्थी आणि ग्रंथालय या दोहोंच्या वेळेची बचत होऊन सेवा तत्परतेने देणे शक्य होणार आहे.

## ऋणनिर्देश

डी. जी. रूपारेल महाविद्यालयातील 'पुस्तकपेढी' योजनेच्या पाहणीची आखणी, उपयोजन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. तुषार देसाई सर आणि ग्रंथपाल डॉ. प्रदीप कर्णिक यांचे मोलाचे मार्गदर्शन तसेच ग्रंथालयातील सहकाऱ्यांचे सहकार्य लाभले आहे.

## संदर्भ

Godi S. P., Paradkar, P. M. & Deshpande, R. M, (2014). User satisfaction and library performance: A survey of Jayawant Library, Rajarshi Shahu College of Engineering, Tathawade, Pune. Journal of Indian Library Association. 50 (3), 12-18.

Goyal, S. P., & Josh's, V. K, (1981). Book Bank scheme in an agricultural university. Herald of Library Science, 20 (3-4), 234-237.

Motiang, l. P., Wallis, M., & Karodia, A. M. (2014). An evaluation of user satisfaction with library services at the University of Limpopo, Medunsa campus (Medical University of Southern Africa). Arabian Journal of Business and Management Review (Oman chapter). 3 (11), 41-57.

Onuoha, U. D., Omokoje, A., & Bamidele, 1. A. (2013), Assessing service effectiveness and satisfaction with library services at Babcock University, Nigeria. Information and Knowledge Management, 3 (9), 84-90.



# वाचन प्रेरणा दिवस : एक उपक्रम

**डॉ. राजेंद्र विठ्ठल चिकटे**
तांत्रिक सहायक (ग्रंथालय)
जयकर ग्रंथालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
e-mail : rvchikate@unipune.ac.in

*वाचन संस्कार रुजविण्याच्या आणि महान शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या कार्याला सलाम करण्याच्या दृष्टीने त्यांच्या जन्मदिनी जयकर ग्रंथालयाच्या वतीने ग्रंथप्रदर्शन आणि व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यासाठी जो प्रतिसाद आणि अभिप्राय मिळाला त्या आकडेवारीवरून लक्षात येते की, आज समाजाला अशा उपक्रमाची गरज आहे. समाज वाचनप्रिय आहे. ग्रंथालयांनी वेगवेगळ्या उपक्रमांद्वारे वाचकापर्यंत पोहोचणे आज गरजेचे आहे असे या उपक्रमावरून लक्षात येते.*

**संज्ञा :** वाचन, ग्रंथप्रदर्शन, वाचन प्रेरणा, वाचन संस्कार

## प्रस्तावना

जीवनातील अनेक प्रसंगांना सामोरे जाण्यासाठी, मान अपमान सहन करण्यासाठी, आनंद आणि दु:ख पचविण्यासाठी जे सामर्थ्य आवश्यक असते ते आपल्याला आत्तापर्यंत वडीलधाऱ्यांच्या अनुभवांतून लक्षात येत असे. एकत्र कुटुंब पद्धती असल्यामुळे आजी-आजोबा यांच्यामार्फत जगात जगावे कसे याचे धडे आणि सामर्थ्य मिळत असे. आजच्या कौटुंबिक परिस्थितीनुसार ते थोरामोठ्यांचे, आप्तस्वकीयांचे अनुभवाचे बोल ऐकायला मिळत नाहीत. आजच्या धावपळीच्या आणि माहिती संप्रेषण आणि तंत्रज्ञानाच्या युगात माया, ममता, प्रेम, जिव्हाळा, आदर, कदर, आपलेपणा हे सर्व आभासी होत चालले आहे. कारण त्याचा आज मनावर परिणाम होताना दिसत नाही. कारण आज कोणीच कोणाची 'कदर' करताना सामाजिक, कौटुंबिक पातळीवर कोठेच दिसून येत नाही. हे थांबवायचे असेल तर आजच्या पिढीला वाचन करणे आवश्यक आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य आणि शिक्षण विभाग यांनी २५ ऑक्टोबर हा डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिवस' म्हणून साजरा करण्यासाठी सर्व शैक्षणिक संस्थांना २०१५ पासून आदेश दिला. त्याबाबत महाराष्ट्र सरकार आणि त्यांचे शिक्षण खाते यांचे शतश: आभार.

वरील उपक्रमाअंतर्गत सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ, जयकर ग्रंथालयाने दि. १२/१०/२०१५ ते १७/१०/२०१५ या कालावधीमध्ये ग्रंथप्रदर्शन आणि डॉ. राजेंद्र कुंभार यांचे व्याख्यान असे उपक्रम आयोजित केलेले होते. त्यातील ग्रंथप्रदर्शन या उपक्रमाला वाचकांचा प्रतिसाद आणि अभिप्राय कशा प्रकारे मिळाला हे जाणून घेण्याचा प्रयत्न या लेखातून करण्यात आलेला आहे.

## उद्दिष्टे

वरील सहा दिवसांच्या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या प्रदर्शनास मिळालेल्या प्रतिसादाचा आढावा घेण्याच्या दृष्टीने पुढील उद्दिष्टे ठरवून या उपक्रमाचा सर्वांगीण अभ्यास करण्यात आलेला आहे.

- ग्रंथप्रदर्शनास भेट दिलेल्या वाचकांचा आढावा घेणे.
- ग्रंथप्रदर्शनातील ग्रंथाची भाहिती घेणे.
- भेट देणाऱ्या वाचकांचे विषय जाणून घेणे.
- वाचकांची शैक्षणिक पात्रता जाणून घेणे.
- वाचकांनी दिलेल्या अभिप्रायाचा अभ्यास करणे.

## व्याप्ती आणि मर्यादा

सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ, जयकर ग्रंथालयाच्या वतीने दि. १२/१०/२०१५ ते १७/१०/२०१५ या कालावधीत आयोजित केलेले ग्रंथप्रदर्शन, त्यातील ग्रंथ आणि अभिप्राय नोंदवहीतील नोंदी यानुसारच माहिती संकलित करण्यात आलेली आहे.

## गृहीतक

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात वाचन संस्कार ओरड सर्व ठिकाणी ऐकण्यास मिळते. पण हे कितपत खरे आहे हे पाहण्यासाठी पुढील गृहीतके मांडण्यात आलेली आहेत.

- विद्यार्थी/संशोधक वाचन करतात.
- सर्वांनाच ग्रंथप्रदर्शनातून वाचन प्रेरणा मिळते.

## संशोधन पद्धती

या अभ्यासासाठी सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करून ग्रंथप्रदर्शनात ठेवण्यात आलेल्या नोंदवही आणि त्यात नोंदविण्यात आलेल्या नोंदीतील माहितीचा वापर या अभ्यासासाठी



करण्यात आलेला आहे. या नोंदवहीमध्ये वाचकाचे नाव, शिक्षण, विभाग, ठिकाण आणि अभिप्राय अशा प्रकारे नोंदी केलेल्या होत्या. त्यानुसारच माहिती संकलित केली व मिळालेल्या माहितीचे चिकित्सक विश्लेषण करून पुढीलप्रमाणे सांख्यिकी स्वरूपात कोष्टकाच्या माध्यमातून माहिती सादर करण्यात आलेली आहे.

## माहितीचे विश्लेषण

या अभ्यासासाठी ठरविण्यात आलेली उद्दिष्टे लक्षात घेऊन त्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी जी माहिती संकलित करण्यात आली त्या माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरण पुढीलप्रमाणे करण्यात आलेले आहे.

## ग्रंथप्रदर्शनातील ग्रंथ

संबंधित कालावधीत ग्रंथप्रदर्शनामध्ये ललित साहित्य आणि चरित्रात्मक ग्रंथ ठेवण्यात आले. त्यांची वर्गवारी आणि एकूण संख्या पुढील कोष्टक क्र. १ मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. १ :** ग्रंथप्रदर्शनातील ग्रंथाची वर्गवारी

| अनु. क्र. | साहित्य प्रकार | ग्रंथ संख्या |
|---|---|---|
| १ | समाजसुधारक (चरित्र/आत्मचरित्रे) | ५० |
| २ | राजकीय व्यक्ती (चरित्र/आत्मचरित्रे) | ८९ |
| ३ | उद्योगपती (चरित्र/आत्मचरित्रे) | ७५ |
| ४ | शास्त्रज्ञ (चरित्र/आत्मचरित्रे) | १०५ |
| ५ | इतर व्यक्ती | १२३ |
| ६ | ललित साहित्य | १९२ |
| एकूण | | ६३४ |

कोष्टक क्र. १ मध्ये ग्रंथप्रदर्शनामध्ये मांडण्यात आलेल्या ग्रंथांची वर्गवारी देण्यात आलेली आहे. त्यात समाजसुधारकांची चरित्रे आणि आत्मचरित्रे याची संख्या जवळजवळ ५० झाली होती. त्यात बाबा आमटे, गाडगेबाबा, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णा हजारे आणि इतर समाजसुधारकांशी संबंधित ग्रंथ होते. राजकीय व्यक्तींची चरित्रे आणि आत्मचरित्रे यांची संख्या जवळजवळ ८९ झाली होती. यात महात्मा गांधी, इंदिरा गांधी, अटलबिहारी वाजपेयी, अडवाणी, राजीव गांधी, यशवंतराव चव्हाण, शरद पवार आणि इतर राजकीय व्यक्ती यांच्याशी संबंधित ग्रंथ होती.

ग्रंथप्रदर्शनामध्ये वेगवेगळ्या उद्योपतींचे चरित्रे आणि आत्मचरित्रे ठेवण्यात आलेली होते. त्यात जे. आर. डी. टाटा, फिरोदिया, डी. एस. कुलकर्णी, रतन टाटा, विठ्ठल कामत आणि इतर असे एकूण ७५ ग्रंथ मांडण्यात आलेले होते. ग्रंथाचा चौथा वर्ग हा शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ यांची चरित्रे आणि आत्मचरित्रे करण्यात आलेला होता. त्यात डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी लिहिलेले सर्वच ग्रंथ आणि इतर शास्त्रज्ञांची चरित्रे आणि आत्मचरित्रे अशी एकूण १०५ ग्रंथ होते.

त्याचबरोबर ग्रंथाचा पाचवा गट हा वेगवेगळ्या क्षेत्रांतील व्यक्ती उदा. क्रीडा, साहित्य, शिक्षण, इत्यादी. त्यात उत्तम कांबळे यांची लिहिलेले ''वाट तुडवताना'' हा ग्रंथ त्याबरोबर गावस्कर, सचिन तेंडुलकर आणि इतर अनेक क्षेत्रांतील व्यक्तीची चरित्रे आणि आत्मचरित्रे अशी एकूण १२३ प्रेरणादायी ग्रंथ प्रदर्शनात ठेवण्यात आलेले होते. ग्रंथाचा सहावा भाग ललित साहित्याचा होता. त्यात कथा, कादंबरी, नाटक, कविता संग्रह, प्रवासवर्णन अशा प्रकारचे जवळजवळ १९२ ग्रंथ मांडण्यात आलेले होते. त्यात नटसम्राट, घाशीराम कोतवाल, एकच प्याला, मृत्युंजय, अमृतवेल, वणवा, ययाती, युगंधर, स्वामी, सुधामुनी, चेतन भगत अशा प्रकारचे गाजलेली आणि समाजाने डोक्यावर घेतलेले ग्रंथलेखकांचे ग्रंथ मांडण्यात आलेले होते.

वरीलप्रमाणे ग्रंथांची निवड आणि त्यांची त्या-त्या गटानुसार केलेली मांडणी यामुळे ग्रंथप्रदर्शनास भेट देणाऱ्या प्रत्येक वाचकास ग्रंथप्रदर्शन खूपच आवडले आणि असा उपक्रम सतत चालू ठेवावा, असा अभिप्राय जवळ जवळ २५% वाचकांनी नोंदवलेला आहे.

## ग्रंथप्रदर्शनास भेट

दि. १२/१०/२०१५ ते १७/१०/२०१५ या कालावधीमध्ये ग्रंथप्रदर्शनास ज्या वाचकांनी भेट दिली, त्यांची नोंद नोंदवहीमध्ये करण्यास सांगितलेली होती. त्याचबरोबर त्यांना अभिप्रायही नोंदविण्यास सांगितलेला होता. त्यानुसार सर्व वाचकांशी नोंदी केल्या, पण अभिप्राय मात्र काही मोजक्या वाचकांनीच नोंदविलेला आहे. त्यांची आकडेवारी पुढील कोष्टक क्र. २ मध्ये देण्यात आलेली आहे.



**कोष्टक क्र. २ :** ग्रंथप्रदर्शनास भेट दिलेल्या वाचकांची संख्या

| अन. क्र. | दिनांक | ग्रंथप्रदर्शनास भेट | ग्रंथ प्रदर्शनास भेट व अभिप्राय | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | १२/१०/२०१५ | ७५ | ०७ | ८२ |
| २ | १३/१०/२०१५ | १५५ | २० | १७५ |
| ३ | १४/१०/२०१५ | १३५ | २३ | १५८ |
| ४ | १५/१०/२०१५ | १८५ | ३५ | २२० |
| ५ | १६/१०/२०१५ | १०५ | १४ | ११९ |
| ६ | १७/१०/२०१५ | ९६ | ३१ | १२७ |
| | एकूण | ७५१ | १३० | ८८१ |

वरील कोष्टक क्रमांक २ वरून असे लक्षात येते की, वरील सहा दिवसाच्या कालावधीमध्ये एकूण ८८१ वाचकांनी ग्रंथ प्रदर्शनास भेट दिलेली आहे. त्यापैकी १३० वाचकांनी ग्रंथप्रदर्शनाविषयीचा आपला अभिप्राय नोंदविलेला आहे. याचाच अर्थ असा होतो की, कमीतकमी १४.७५% वाचकांनीच अभिप्राय नोंदविलेला आहे आणि जास्तीतजास्त ८५.२५% वाचकांनी अभिप्राय नोंदविलेला नाही. ग्रंथप्रदर्शनास भेट देणाऱ्या प्रत्येक वाचकांना अभिप्राय नोंदविण्यासाठी विनंती करणे आवश्यक आहे. कारण या अभिप्रायामुळेच ग्रंथप्रदर्शनामध्ये काही त्रुटी असतील तर त्या सुधारण्यासाठी योग्य दिशा मिळणार आहे.

## वाचकांची वर्गवारी

ग्रंथप्रदर्शन सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयात भरवले गेलेले असल्यामुळे त्याठिकाणी एम.ए., एम.एस्सी., एम.फिल. आणि इतर शिक्षणक्रमांसाठी प्रवेश घेणारे विद्यार्थी आहेत. त्यातील कोणकोणत्या शिक्षणक्रमांतील विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा फायदा घेतला हे आपल्याला आकडेवारीच्या स्वरूपात पुढील कोष्टक क्र. ३ वरून लक्षात येते.

**कोष्टक क्र. ३ :** ग्रंथप्रदर्शनास भेट दिलेल्या वाचकांची शिक्षणक्रमानुसार वर्गवारी

| अन. क्र. | वर्ग | भेट दिली | भेट व अभिप्राय | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | एम.ए. | ४२९ | ७७ | ५०६ |
| २ | एम.एस्सी. | २५४ | २२ | २७६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | एम.फिल | १८ | ०५ | २३ |
| ४ | एम.लिब | २१ | ०९ | ३० |
| ५ | पीएच.डी. | १० | ०८ | १८ |
| ६ | एम.कॉम. | १० | ०६ | १६ |
| ७ | शिक्षक | ०९ | ०३ | १२ |
| | एकूण | ७५१ | १३० | ८८१ |

वरील कोष्टक क्र. ३ वरून असे लक्षात येते की, ग्रंथप्रदर्शनास भेट देणाऱ्या एकूण ८८१ वाचकांपैकी जवळजवळ ५०६ हे एम.ए.चे विद्यार्थी होते. त्याचे प्रमाण जवळजवळ ५८% इतके आहे. पण अभिप्राय मात्र फक्त ७७ विद्यार्थ्यांनीच नोंदविलेला आहे. त्याचबरोबर एम.एस्सी.च्या २७६ (३१%) विद्यार्थ्यांनी भेट दिलेली आहे. त्यापैकी फक्त २२ विद्यार्थ्यांनी अभिप्राय नोंदविलेला आहे.

ग्रंथप्रदर्शनास भेट देणाऱ्यांमध्ये सर्वांत कमी प्रमाण हे शिक्षकांचे आहे. ते म्हणजे फक्त १२ एवढेच आहे. हे प्रमाण वाचन संस्कृती किंवा वाचन संस्कार वाढविण्यासाठी योग्य नाही. त्यासाठी हे प्रमाण वाढणे आवश्यक आहे. अशा उपक्रमासाठी शिक्षकांचे प्रमाण हे जास्तीतजास्त असणे गरजेचे आहे.

## शाखानिहाय वाचकांची वर्गवारी

ग्रंथप्रदर्शनास भेट दिलेल्या एकूण वाचकांमध्ये कोणत्या शाखेचे किती विद्यार्थी, किती प्रमाणात आहेत याची माहिती सांख्यिकी स्वरूपात पुढील कोष्टक क्र. ४ मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ४ :** शाखानिहाय वाचकांची वर्गवारी

| अनु. क्र. | शाखा | विद्यार्थी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कला | ५४९ | ६२.३२ % |
| २ | वाणिज्य | ४१ | ४.६५ % |
| ३ | विज्ञान | २९१ | ३३.०३ % |
| | एकूण | ८८१ | १०० |

वरील कोष्टक क्र. ४ वरून असे दिसते की, ग्रंथप्रदर्शनास भेट दिलेल्या एकूण ८८१ वाचकांपैकी जास्तीतजास्त वाचक हे कला शाखेतील आहेत. त्यांचे प्रमाण हे जवळजवळ ६२% इतके आहे. त्याचबरोबर विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचे प्रमाण हे जवळजवळ ३३% इतके आहे. आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचे प्रमाण हे फक्त



५%च्या दरम्यान आहे. हे प्रमाण वाढविण्यासाठी ग्रंथालय सेवकांनी आणि शिक्षकांनी अशा उपक्रमांबाबत विद्यार्थ्यांना माहिती देणे व अशा उपक्रमांत सहभाग नोंदविण्यासाठी प्रवृत्त करणे गरजेचे आहे. कारण असे उपक्रम राबविणे आणि सर्वांचा त्यात सहभाग असणे हे किती महत्त्वाचे आहे हे आपल्याला ग्रंथप्रदर्शनास भेट देणाऱ्या ८८१ पैकी ज्या १३० वाचकांनी अभिप्राय दिला त्यातील पुढील काही महत्त्वाचे अभिप्राय वाचल्यानंतर अशा उपक्रमाची गरज समाजाला किती प्रमाणात आहे हे लक्षात येते. ते अभिप्राय पुढीलप्रमाणे :

- महिन्यातून एकदा असा उपक्रम राबवावा.
- पुस्तके गौरवास्पद आहेत.
- यातून विद्यार्थ्यांच्या वाचन सवयीला नक्कीच चालना मिळेल.
- प्रदर्शनाची मांडणी फारच छान आहे.
- ज्यांनी ग्रंथप्रदर्शन आणि डॉ. कुंभार यांचे व्याख्यान याचे आयोजन केले, त्यांचे मी अभिनंदन करतो.
- पुस्तकाचे प्रदर्शन आणि व्याख्यान खूप आवडले.
- असे उपक्रम चालूच राहतील अशी आशा बाळगतो.
- अप्रतिम उपक्रम आहे, जीवनातील आजच्या दिवसाचे सार्थक झाले.
- या प्रसंगावरून आजचा विद्यार्थी नियमित वाचेल असे वाटते.

वरील सर्व अभिप्राय हे वेगवेगळ्या वाचकांकडून तीनपेक्षा जास्त वेळा नोंदविण्यात आलेले आहेत. वरील सर्व अभिप्राय वाचल्यानंतर असे उपक्रम खूपच महत्त्वाचे आहेत. वाचक वाचतात हे लक्षात येते. आता ग्रंथालयांनी वाचकांना वाचन करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे गरजेचे आहे. वाचन किती महत्त्वाचे आहे आणि वाचनामुळे कोणकोणते फायदे होतात याची जाणीव आज समाजाला पुन्हा-पुन्हा करून देण्याची गरज आहे. अनेक लेखक, विचारवंतांनी पुस्तकाचे हे महत्त्व मांडले आहे, जयवंत दळवी यांनी ''पु. ल. एक आठवण'' नावाचे पुस्तक संपादित केले आहे. त्यामध्ये त्यांनी पत्रेही समाविष्ट केली आहेत. त्या पत्रात एक पत्र पु. लं.च्या आईचे आहे. त्या पत्रात त्यांनी असे लिहिलंय की, मन सैरभैर झालं की, मी भाईची पुस्तकं काढून वाचते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ग्रंथ हे माझे श्वास आहेत. यावरून असे वाटते की मानवी मनाच्या प्रत्येक अवस्थेला ग्रंथ हा पर्याय आणि मित्र बनवण्याच्या दृष्टिकोनातून सर्व ग्रंथालयांतील व्यावसायिकांनी व्यक्तिगत पातळीवर सर्वतोपरी सतत प्रयत्न करणे गरजेचे आहे.

आजची समाजातील बेपर्वाई, गुन्हेगारी, चंगळवाद, नात्यातील कटुता, भरकटलेला समाज यांना 'योग्य दिशा' द्यायची असेल तर समाजाला वाचन करणे ही

काळाची गरज आहे. त्यासाठी अशा उपक्रमाद्वारे समाजामध्ये वाचन आणि त्याचे फायदे काय? कोणी काय वाचावे? कोणत्या वेळी काय आणि कोणत्या वयोगटातील वाचकांनी काय वाचावे किंवा कोणते ग्रंथ वाचावेत हे सांगण्याची कुवत आज ग्रंथालयीन व्यावसायिकांमध्ये निर्माण झाली तर त्यातून उद्याचा सकारात्मक विकास साधणारा समाज घडण्यास खूपच मोलाची मदत मिळणार आहे.

**संदर्भ**


१. कर्णिक प्रदीप, ग्रंथपुण्यसंपत्ती, मुंबई : नवचैतन्य प्रकाशन, २०१०; पृ. १६१

२. कर्णिक प्रदीप, जावे ग्रंथाच्या गावा, ठाणे : डिंपल पब्लिकेशन, २०००.

३. चित्रा नाईक आपले वाचन, पुणे : नाईक चित्रा, १९७९.

४. तुपे, नवनाथ, वाचन : दिशा आणि दृष्टिकोन, औरंगाबाद : कैलास पब्लिकेशन, २००८.

५. मोरे, सतिश, वाचन संस्कार, पुणे : पद्मगंधा प्रकाशन, १९९८.

६. सारंग, विलास, लिहित्या लेखकाचं वाचन, मुंबई : शब्द प्रकाशन, २०११.

७. स्टेगर, राल्प वाचनाच्या वाटा, औरंगाबाद : परिमल प्रकाशन, १९८९.




## मराठी ज्ञानकोश रचण्याचा पहिला प्रयत्न : विद्याकल्पतरू

**गं. दे. खानोलकर**

*प्रख्यात चरित्रकार मा. कै. गं. दे. खानोलकर यांनी एप्रिल, १९६९च्या 'मराठी संशोधन पत्रिके'त (वर्ष १६ अंक ३) लिहिलेला हा लेख. ज्ञानकोशकार श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या ज्ञानकोश कार्याआधीही मराठीत एका ज्ञानकोश कार्याला प्रारंभ कसा झाला होता, त्याचे कितीतरी भागांचा मजकूर प्रकाशितही झाला होता, याची चर्चा या लेखात खानोलकरांनी केली होती. या कोशाकाराच्या आयुष्यावरही त्यांनी प्रकाश टाकला असून, कोशातील एका नोंदीचे उदाहरणही या लेखात त्यांनी दिले आहे.*

*ज्ञानकोशाचा इतिहास लिहिताना किंवा मूल्यमापन करताना मराठीतील हा पहिलावहिला प्रयत्न कोणी फारसा विचारात घेत नाही. मात्र ग्रंथवाचकांनी अशा इतिहासाकडे दुर्लक्ष करून चालणार नसल्याचे जुन्या लेखातला अजूनही शिल्लक असणारा हा ताजेपणा या अंकात सादर केला आहे.*

*'मराठी संशोधन पत्रिके'सारखे केवळ संशोधन कार्याला वाहिलेले मराठीतील जुने त्रैमासिकाने सध्या ६५व्या वर्षात पर्दापण केले आहे. सदर अंक प्रत्येक ग्रंथालयात का असू नये?*

*– संपादक*

### विद्याकल्पतरू

Marathi Cyclopoedia
OR
Vidia Kulputuroo
Of
Practical Receipts Colateral Information
in the Arts, Manufacturers,
Professions & Trades
including
Medicine, Pharmacy, and Domestic Economy
Designed as a Comprehensive Suplement
to the Pharmacopias
and General Book of Reference
for the

Manufacturers, Tradesmen, Amatures
and heads of Families
By
R. K. SAMBARAY
ह्मणजे
मराठी भाषेमध्ये विद्यासंग्रह
अगर
जीत

नाना प्रकारच्या विद्या, कला, कौशल्ये, युक्ती व तत्संबंधी मोठमोठे कारखाने तशीच कित्येक प्रकारची हुन्नरें, औषधे व त्यांची क्रिया व गृहसंबंधी सर्व व्यवस्था ह्यांचा विचार करून प्रत्येक वस्तूचे अन्योन्यपार्श्वस्थित अनुभवसिद्ध निरूपण केले आहे.



मुखपृष्ठाच्या आतील भागावर खालील अर्पण-पत्रिका छापली आहे.

हे पुस्तक
वीर क्षेत्रस्थ प्रभू

श्रीमंत महाराज खंडेराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बहादूर, नैट ग्रांड कमांडर ऑफ दि मोस्ट एक्झाल्टेड् ऑर्डर ऑफ दि स्टार आफ इंडिया

ह्यांच्या सेवेत

ह्यांचा आज्ञाधारक व निरंतर चरणी तत्पर असा खाली सही करणार ललीन व नम्र सेवक ह्याने आपल्या प्रभूंचे मन सकल विद्या, कला आणि कौशल्ये इत्यादिकांची सर्वत्र प्रदेशांत वृद्धी असण्याविषयी निरंतर उद्युक्तता जाणून सर्वास उपयुक्त व संग्रह करण्यास योग्य असा हा ग्रंथ अनुभवाने आणि कित्येक ग्रंथांच्या आधाराने सर्वमान्य सिद्ध केला आहे व प्रतिमहिन्यास त्यापैकी थोडा छापण्याचा नियम ठरवून महाराजांस अत्यादरें नजरा केला आहे.

– रावजी बिन केशवराव सांबारे
शिलेदार निसबत गायकवाड सरकार,
ग्रंथकार

ह्या मासिकाचा आकार रॉयल अष्टपत्री असून, प्रत्येक अंक १६ पृष्ठांचा असे ठाणे येथील अरुणोदय छापखान्यात ते छापले जाई. त्याची वर्षाची आगाऊ वर्गणी तीन रुपये व दर प्रतीस ५ आणे किंमत ठेविली होती.

'विद्याकल्पतरू'त प्रसिद्ध होणारा सर्व ज्ञानसंग्रह हा 'संदर्भग्रंथस्वरूप' असल्यामुळे विषय अक्षरानुक्रमाने दिले जात व पृष्ठांचा अनुक्रमही चालूच ठेवलेला असे. १८७१च्या फेब्रुवारी महिन्यापर्यंत ह्याचे ३५ अंक निघून 'ड' अक्षरापर्यंत विविध विषयांवरील ५६० पृष्ठांचा मजकूर प्रसिद्ध झाला.' प्रसिद्ध प्राच्यविद्यापंडित डॉ. भाऊ दाजी लाड ह्यांचे बंधू डॉ. नारायण दाजी ह्यांनी आपल्या नावाने ह्यांतील रसायनशास्त्रविषयक लेख लिहिले आहेत. त्यांनी आपल्या लेखात मराठीत शास्त्रीय परिभाषा बनवून तिचा वापर करण्याचे धोरण न ठेवता इंग्रजी परिभाषा जशाची तशीच ठेविली आहे, त्यामुळे 'ह्या असिडाचे १०० ग्रेन, स्फटिकरूप, कार्बोनेट ऑफ सोड्याचे ८७ ग्रेनानी न्यूत्रलाइज होतात. 'वास्तविक असिड म्हणजे पाण्याचे असिटेट ह्याची घटना येणेप्रमाणे' – अशा तऱ्हेची घेडगुजरी वाक्ये लिहिली गेली आहेत.

डॉ. नारायण दाजी ह्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणाकोणाचे 'विद्याकल्पतरू' साहाय्य होते ते कळण्यास मार्ग नाही. लोकहितवादी गोपाळराव देशमुख ह्यांजकडून

त्यात मार्गदर्शन धडे असे म्हणतात. स्वत: संपादक रावजी केशव सांबारे हे स्वभावप्रमाणेच इंग्रजी, संस्कृत, फार्सी, हिंदुस्थानी, गुजराथी या भाषांचे जाणकार होते. या भाषांतील ग्रंथांच्या, त्याचप्रमाणे 'एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका'च्या आधारे त्यांनी स्वत:च ह्यांतील बरेचसे लेख लिहिले असावेत. यांत आलेल्या विषयांसंबंधी ते लिहितात:

''यांत व्यवहारोपयोगी ज्या कला, कौशल्ये, विद्या, हुन्नरे व युक्ती आहेत याविषयींचा विस्तार व त्या तयार होण्यास काय काय द्रव्यें लागणार त्यांची नावे व कृती आणि तत्संबंधी नाना प्रकारची यंत्रे व त्यांच्याही कृतींचे निरूपण केले आहे. जेणेकरून कोणत्याच गोष्टींविषयी कोणासही संशय पडू नये.

''या पुस्तकात ज्या वस्तू करण्याची कृती प्रसिद्ध केली आहे ती केवळ ग्रंथांवरून अगर ऐकीवच आहे असे मानू नये. हुशार व सुगर मनुष्यांपासून या कृती करवून प्रत्यक्ष अनुभव घेतला आहे.''

'विद्याकल्पतरू'चे संपादक रावजी केशव सांबारे हे जसे ज्ञानाभिलाषी, हरहुन्नरी होते तसेच दरबारी राजकारणात लक्ष घालणारे असावे असे दिसते. खंडेराव गायकवाडांचा खास लोभ संपादिलेले हे त्यांचे शिलेदार होते. त्यांस इंग्रजी लिहिता वाचतां येत असल्यामुळे महाराजांस, रेसिडेंकडून येणाऱ्या चिठ्या समजून घेण्यास व त्यांची उत्तरे धाडण्यास त्याचा फार उपयोग होई. रावजींना ते आपल्या विश्वासांतील एक माणूस असे समजत. महाराजांशी असा हा संबंध असल्यामुळे रावजींस 'विद्याकल्पतरू'च्या उद्योगाच्या कामी त्यांजकडून चांगलेच द्रव्यसाहाय्य मिळाले. या साहाय्यामुळेच 'विद्याकल्पतरू' पावणेतीन वर्षे नियमितपणे चालला. १८७० साली महाराजांचा मृत्यू न घडता व त्यांच्या पश्चात दरबारी पारडे फिरून रावजींचा मृत्यू १८७२ साली तुरुंगात न होता, तर 'विद्याकल्पतरू' पुढेंही काही वर्षे चालू राहून प्रारंभीच्या योजनेप्रमाणे ज्ञानसंग्रहाचे काम खात्रीने पूर्ण झाले असते. 'उ' या अक्षरापर्यंत जेथे ५६० पृष्ठे खर्ची पडली तेथे सर्व अक्षरे पूर्ण झाली असती तर हा 'विद्यासंग्रह' किती पृष्ठांचा झाला असता याची सहज कल्पना करता येण्यासारखी आहे.

'विद्याकल्पतरू' हे नाव सांबारे यांस कृष्ण मोहन बंद्योपाध्याय (१८१३-१८८५) यांनी बंगला भाषेत रचिलेल्या 'विद्याकल्पद्रुम' (१८४६-५१) या ज्ञानकोशाच्या नावावरून सुचले असेल काय? बंगला भाषेत ज्ञानकोश रचण्याचा पहिला उपक्रम सेरामपूर (श्रीरामपूर) येथील बॅप्टिस्ट मिशनरी फेलिक्स केरी याने, 'विद्याहारावलि' असे नाव देऊन १८२२ साली केला. त्याजकडून त्याचा एकच भाग प्रसिद्ध झाला. ते काम पुढे थांबले. पण कृष्ण मोहन बंद्योपाध्याय (बानर्जी) या ख्रिस्ती बनलेल्या एका गृहस्थाने ते काम 'विद्याकल्पद्रुम' हे नाव देऊन १८४६ साली कोलकोता येथे सुरू करून १८५१



साली तेरा भागांत ते पूर्ण केले. याची त्याने इंग्लिश-बंगाली आवृत्तीही प्रसिद्ध केली. 'विद्याकल्पद्रुम' हा भारतीय भाषांतील पहिला विस्तृत व संपूर्ण ज्ञानकोश होय.

'विद्याकल्पद्रुम'मधील नोंदी कशा असत याची साधारण कल्पना यावी म्हणून पुढे एक, पद्यप्रकारविषयक नोंद नमुन्याखातर दिली आहे.

अभंग - ईश्वर गुण वर्णन प्रधान प्राकृत भाषेत कवितेची एक जाती आहे; अभंगास अक्षरांचा नियम आहे, परंतु कधी कधी एका गुरू अक्षराच्या जागी दोन लघू अक्षरे येतात, यामुळे एक दोन अक्षरे कमीजास्ती आढळतात. एकेका अभंगास चार चार अथवा पाच पाच कडवी असतात.

१. अभंगाच्या चालीविषयी नियम लिहिलेले कोठे आढळत नाहीत. बायका ज्या ओव्या म्हणतात त्यात किती एक अभंगाच्या चाली आढळतात. उदाहरण :

पहिली माझी ओवी ।। पहिला माझा नेम
तुळशी खाली राम।। पोथी वाची ।।१।।

२. अभंगाच्या ऐकाक कडव्यास चार चार चरण असून पहिल्या तीन चरणांची अक्षरे सहा सहा आणि चौथ्याची चार, अशी असतात; आणि दुसऱ्या व तिसऱ्या चरणास यमक असते; उदाहरण

सर्व सावधान, होऊनी विचारा । सांडवण करा,
संसाराची ।।१।। (नामदेव) २ उदाहरण
जनहे सुखाचे ।। दिल्या घेतल्याचे ।।
अंत काळींचे ।। नाहीं कोणी ।।१।। (तुकाराम)

पहिल्या आणि दुसऱ्या उदाहरणाच्या अभंगाच्या पहिल्या तीनही चरणात यमक आहे.

३. एकेका कडव्यास दोन दोन चरण असून त्यांच्या अंती यमक असतो, या प्रकारच्या अभंगात पहिल्या चरणास अक्षरे आठ किंवा कधी कधी सहा आढळतात आणि दुसऱ्या चरणात आठ, उदाहरण

भावें गावे गीत ।। शुद्ध करोनिया चित्त ।। (तुकाराम)

४. चौथ्या रितीच्या अभंगात पहिल्या चरणाचे शेवटचे यमकाक्षर दुसऱ्या चरणाच्या शेवटी न येता मध्ये येते. उदाहरण

पुढें आता कैचा जन्म ।। ऐसाथमवारेसा ।।१।।
सर्वथाहीफिरोंनये ।। ऐशिसोयलागलीया ।।२।।

५. या रितीच्या अभंगात चार चरण असतात. पहिल्या चरणास आठाठ अक्षरे व

चौथ्यास प्राय: सात अक्षरे असून यमक पहिल्या तीन चरणाच्या शेवटी मात्र असतो, उदाहरण

देवा पायी नाहीं भाव ।। भक्तिवरीवरीवाय ।।
समर्पिला नाहीं जीव ।। जाणाहाव्यभिच्यार ।।१।। (तुकाराम)

अभंगास नियम नसल्यामुळे उदाहरणें घेऊन त्यावरून जे नियम दिसून आले ते वर दाखविले आहेत.

अशा रितीने अभंग करणारे बहुत कवी झाले, त्यांत मुख्यत्वे करून नामदेव, तुकाराम, वगैरे. यात नामदेवाबद्दल अशी दंतकथा आहे की, नामदेवास शतकोटी अभंग करण्याविषयी दृष्टांत झाला, त्यावरून नामदेव व त्या कुटुंबाची माणसे यांनी मिळून ९९ कोटी व ९६ लक्ष अभंग केले, चार लक्ष उरले ते पुढे तुकारामांने पुरे केले.

खंडेराव महाराजांच्या मृत्यूनंतर ते निपुत्रिक असल्यामुळे बडोद्याच्या गादीवर त्यांच्या पश्चात कोणाला बसवावयाचे याचा ब्रिटिश सरकार विचार करू लागले. महाराजांची पत्नी जम्नाबाई या त्यावेळेस गरोदर होत्या. त्यांस पुत्रसंतान झाल्यास त्याकडेस स्वाभाविकपणे गादीचा वारसा जाणार ! पुत्रसंतान न झाल्यास महाराजांचे धाकटे बंधू मल्हारराव हेच गादीचे वारस व्हावयाचे. अशा परिस्थितीत बडोद्यात गुप्त कारस्थानांना ऊत आला. जम्नाबाईचा एक पक्ष व मल्हाररावांचा दुसरा पक्ष, असे दोन पक्ष निर्माण झाले. रावजी सांबारे हे जम्नाबाईच्या पक्षाचे नव्हे, त्यांच्या यजमानांप्रमाणेच त्यांच्याही खास विश्वासातले, जम्नाबाईतर्फे मुंबईस सरकारकडे वेळोवेळी निरोप घेऊन जाण्याचे किंवा त्यांच्या प्रकरणी निवेदन लिहून देण्याचे हेच काम करीत. त्यामुळे मल्हारराव महाराजांची त्यांजवर वक्रदृष्टी झाली. पुढे जम्नाबाईसाहेब प्रसूत होऊन त्यांना पुत्ररत्न न होता कन्यारत्न झाल्यामुळे (५ जुलै १८७१) मल्हाररावांचा पक्ष अधिकच जोरात आला. (ब्रिटिश सरकारने मल्हाररावास गादीचा वारस ठरवून त्याजकडे १० ऑगस्ट १८७१ रोजी राज्याधिकार सुपुर्द केले. राज्यावर येताच मल्हाररावांनी आपल्या एकेका विरोधकाला नेस्तनाबूत करण्यास सुरुवात केली. रावजी सांबारे हे त्यांतील एक. त्यांच्या संदर्भात जम्नाबाईसाहेब ह्यांचे चरित्रकार सखाराम गणेश मुजुमदार हे लिहितात :

''आपल्या उद्दिष्ट हेतूंच्या आड महाराणी जम्नाबाईच्या पक्षाची मंडळी फार येते; म्हणून मल्हारराव महाराज आणि त्यांच्या पक्षाच्या मंडळीने निरनिराळी तर्कटें रचली. त्यांनी प्रथम रावजी केशव सांबारे यांस खराब करण्याचा विचार केला. महाराणी जम्नाबाईंचा हा अत्यंत विश्वासू गृहस्थ, मुंबईस राजपत्नीच्या कामासाठी गेला होता. त्याच्यावर चोरीचा खोटा आरोप ठेवून त्याला, कर्नल बारसाहेबांच्या



मदतीने मुंबईहून पकडून बडोद्यास आणिले ! त्याच्यावर दाखविण्यापुरते रीतसर काम चालवून मल्हाररावांनी त्यास कैदेत टाकिले. खंडेराव महाराजांनी हिरा नीट करण्यासाठी रावजी केशवाजवळ दिला होता, तो त्याने परत जवाहीरखान्यात आणून दिला नाही. हाच काय तो आरोप व तोही मुळांतून खरा नव्हता. यास खराब करण्याचे आणखीही एक अंतस्थ कारण होते. रावज केशव यांनी ''मल्हारराव हे राज्य करण्यास लायक नाहीत'' असा महाराणी जम्नाबाईंच्या तर्फे मुंबई सरकारास अगोदरच रिपोर्ट केला.

(२) महाराणी जम्नाबाईसाहेब गायकवाड यांचे चरित्र (१९०५- बडोदे), पृ. ८०-८१

हा त्यावेळी बडोद्यास रेसिडेंट होता. कर्नल बार हे मल्हाररावांच्या पक्षाचे असल्याने त्यांनीही ह्या कामाचा गुप्तपणे तपास चालविला. रावजीच्या घरावर सरकारांतून एकदम जप्ती बसविली, त्यावेळी त्याचे महत्त्वाचे सर्व कागद घरातच होते. शेवटी भाऊ साने ह्याने पोलिसाच्या वेशाने रात्री रावजी केशव ह्याच्या घरात जाऊन ते कागद हस्तगत केले आणि महाराणी जम्नाबाईस आणून दिले. कर्नल बार ह्यांस रावजीने आपले जवळच्या नकलांवरून त्यांच्या दप्तरांतील अस्सल कागद दाखवून त्यांची खात्री केली होती. मल्हारराव महाराजांच्या अब्रूवर हात टाकण्याचा महाराणी जम्नाबाई व त्यांनी मंडळी ह्यांचा प्रयत्न आहे, असे दाखवून त्यांना गुन्हेगार ठरविण्याचा कर्नल बार ह्यांचा हेतू होता. कैदेत असता तुरुंगातील कामगार भुजंगराव ह्यांचेकडून रावजी केशव ह्यांस जबरदस्तीने विष पाजल्यामुळे त्यांचा तेथेच अंत झाला. रावजींचा हा असा शेवट झाल्याने अनाथ राणीच्या पक्षाला कोणी उघड मिळेनासे झाले.''

संस्थांनी षड्यंत्रांत सापडून रावजी केशव सांबारे नामशेष झाले. त्यांच्या विद्यासंग्रहविषयक कामगिरीची दखल तर त्यावेळी व पुढेही कोणाला द्याविशी वाटली नाही. 'नेटिव ओपिनियन' सारख्या पत्रांत (२८ जानेवारी १८७२) 'वर्तमानसार' ह्या सदरात 'आमचे ऐकण्यात असे आले आहे की, बडोद्याचे प्रख्यात रावजी मास्तर सांबारे हे मरण पावले' ह्यापलीकडे त्यांच्याविषयी एक अक्षरही आले नाही.

मराठीत ज्ञानकोशसदृश संदर्भग्रंथ रचिण्याचा पहिला प्रयत्न ह्या दृष्टीने 'विद्याकल्पतरू'ला मराठी वाङ्मयेतिहासात निश्चित महत्त्व आहे. एक आद्य मराठी ज्ञानकोशकार ह्या नात्याने वाङ्मयेतिहासकारासही रावजी केशव सांबारे ह्यांची अवश्य दखल घ्यावी लागेल.

# लेखकांसाठी सूचना

ज्ञानगंगोत्री त्रैमासिकासाठी ग्रंथालयशास्त्र क्षेत्रातील विविध तज्ज्ञांकडून लेखन मागविण्यात येते. ज्ञानगंगोत्री त्रैमासिकाच्या प्रकाशनाची भाषा मराठी आहे. लेख साधारणपणे ५००० शब्दांचा असावा आणि लेखाचा सार १०० ते १२५ शब्दांत असावा. हे लेख संशोधनात्मक, डेटावर आधारित विश्लेषित माहितीचे सादरीकरण, माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान, नावीन्यपूर्ण आस्थापनाची कार्यशैली, ज्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्राच्या वर्तमान घटना, घडामोडींवर आधारित असतील. लेखाव्यतिरिक्त पुस्तक परीक्षण, वेबसाईटची माहिती व अन्य सदरांकरिताची माहिती १००० ते १५०० शब्दांची असावी. लेखन टाईप करताना स्पेस ठेवण्यात यावी. कागदाच्या एकाच बाजूस मुद्रित करून सर्व बाजूंनी किमान १ इंच जागा सोडण्यात यावी. युनिकोड फॉन्टचा वापर करून मुद्रित केलेला लेख सॉफ्ट कॉपीच्या स्वरूपात ईमेलने (librarian@ycmou.digitaluniversity.ac) पाठविण्यात यावा. मुद्रित लेख (डॉ. मधुकर शेवाळे, संपादक-ज्ञानगंगोत्री, प्रमुख-ग्रंथालय आणि माहितीस्रोत केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक - ४२२ २२२) यांच्याकडे पोस्टाने पाठवावा.

लेख सादर करताना उपयोगात आणलेल्या वाचन साहित्याकरिता एपीए स्टाईल मॅन्युअलच्या नव्या (अलीकडील) आवृत्तीनुसार संदर्भ देण्यात यावेत. लेखामध्ये वापरण्यात येणाऱ्या सर्व संदर्भांचे अचूक व सुयोग्य मांडणी करून पाठविण्याची जबाबदारी लेखकाची आहे. ज्ञानगंगोत्रीमध्ये प्रकाशित होणाऱ्या सर्व लेखांचे स्वामित्व हक्क हे विद्यापीठाचे राहतील.